# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -३०१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. २८ डिसेंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## डॉ. मनमोहन सिंग अनंतात विलीन; निगमबोध घाटावर अंत्यसंस्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८नवी दिल्ली**

भारताचे माजी पंतप्रधानडॉ. मनमोहन सिंग आज (शनिवारी) पंचतत्त्वात विलीन झाले. त्यांच्या पार्थिवावर दिल्लीतील निगम बोध घाटावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. मनमोहन सिंग यांच्या मुलींनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले. यावेळी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे विरोधीपक्ष नेते राहुल गांधी, काँग्रेसच्या सोनिया गांधी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते उपस्थितांनी माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहिली.मनमोहन यांच्या पत्नी गुरशरण कौर, मोठी मुलगी उपिंदर सिंग (६५), दुसरी मुलगी दमन सिंग (६१) आणि तिसरी मुलगी अमृत सिंग (५८) निगम घाटावर उपस्थित होते. या कुटुंबाने पंतप्रधान मोदींचीही भेट घेतली. मुलीने मुखाग्नी दिला.




आज संपूर्ण देशाने मनमोहन सिंग यांना अखेरचा निरोप दिला. मनमोहन सिंग यांचे पार्थिव आज सकाळी ८ वाजता त्यांच्या ३, मोतीलाल नेहरू रोड, नवी दिल्ली येथील निवासस्थानावरून काँग्रेस मुख्यालयात आणण्यात आले. यानंतर त्यांचे पार्थिव काही तास काँग्रेस कार्यालयात ठेवण्यात आले होते, तेथे सामान्य जनता आणि काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्यांना आदरांजली वाहिली. येथे सोनिया गांधी, राहुल गांधी, मल्लिकार्जुन खरगे यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेत्यांनी मनमोहन सिंग यांना आदरांजली वाहिली. त्यानंतर त्यांचे पार्थिव निगम बोध घाटावर नेण्यात आले. तेथे त्यांच्या मुलींनी त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले.मनमोहन सिंग यांचे २६ डिसेंबरच्या रात्री निधन झाले. दिल्लीतील एम्स रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. सिंग हे ९२ वर्षांचे होते. ते काही काळ आजारी होते. त्यांना एम्स रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मनमोहन सिंग २००४ ते २०१४ पर्यंत देशाचे पंतप्रधान होते. देशाच्या अर्थव्यवस्थेत त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. त्यांनी देशात आर्थिक सुधारणांचा पाया रचला. मनमोहन सिंग यांच्या स्मरणार्थ केंद्र सरकारने देशात सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. पंतप्रधान असताना त्यांनी माहिती क्रांती, मनरेगा, शेतकऱ्यांची कर्जमाफी, शिक्षणाचा अधिकार अशी ऐतिहासिक पावले उचलली. त्यांनी माहितीचा अधिकार (आरटीआय), शिक्षणाचा अधिकार (आरटीई) आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) यासारख्या योजना आणल्या.


अंत्यसंस्काराच्या वेळीही मनमोहन सिंग यांना निळी पगडी घातली होती. फेंट निळा हा मनमोहन यांचा आवडता रंग आहे आणि त्यांना केंब्रिज विद्यापीठाच्या दिवसांची आठवण करून द्यायचा, म्हणूनच ते नेहमी निळा पगडी घालत असत.

**देशातील पहिले शीख पंतप्रधान, सर्वाधिक काळ हे पद भूषवणारे चौथे नेते**

मनमोहन सिंग २००४ मध्ये देशाचे १४ वे पंतप्रधान बनले. या पदावर त्यांनी मे २०१४ पर्यंत दोन टर्म पूर्ण केल्या होत्या. ते देशातील पहिले शीख आणि सर्वाधिक काळ सेवा करणारे चौथे पंतप्रधान होते.

त्यांच्या निधनाबद्दल केंद्राने ७ दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. बेळगावीहून गुरुवारी रात्री उशिरा दिल्लीत पोहोचल्यानंतर राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष खरगे थेट मनमोहन सिंग यांच्या निवासस्थानी गेले. काँग्रेसने ३ जानेवारीपर्यंतचे सर्व कार्यक्रम रद्द केले आहेत.

## अभिनेत्री उर्मिला कोठारेच्या कारने दोन मजुरांना चिरडलं, एकाचा मृत्यू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ मुंबई**

अभिनेत्री उर्मिला कोठारेच्या कारचा अपघात झाल्याची बातमी समोर आली आहे. मुंबईतील कांदिवली परिसरातील पोईसर मेट्रो स्टेशनजवळ ही घटना घडली. काल शुक्रवारी (२७ डिसेंबरला) घडलेल्या या घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.

उर्मिला कोठारे शूटिंग संपवून घरी परतत होती, त्यावेळी तिच्या कारचा अपघात झाला. चालकाचं कारवरील नियंत्र सुटल्याने हा अपघात झाला. कारने दोन मजुरांना उडवलं, त्यापैकी एकाचा मृत्यू झाला असून दुसरा मजूर गंभीर जखमी आहे. या अपघातात उर्मिला आणि तिचा ड्रायव्हरही जखमी झाल्याच समजतंय. याप्रकरणी समता नगर पोलीस ठाण्यात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अपघात झाल्यावर गाडीतील एअर बॅग्ज वेळीच उघडल्याने उर्मिलाचा जीव वाचला.

## प्रकाश आंबेडकर सागर बंगल्यावर; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतली भेट, तासभर चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

बीड आणि परभणी प्रकरणावरून विरोधक महाविकास आघाडीचे नेते महायुतीवर जोरदार टीका करताना दिसत आहेत. यातच मस्साजोग सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्ये प्रकरणी बीडमध्ये सर्वपक्षीय आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले. तसेच उद्धव ठाकरे परभणी आणि बीड दौऱ्यावर जाणार असून, सोमनाथ सूर्यवंशी आणि संतोष देशमुख कुटुंबाची भेट घेणार आहेत. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्याची माहिती मिळाली आहे.



वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर बंगल्यावर भेट घेतली. या दोघांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. यानंतर या भेटीबाबत राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले. या भेटीचे नेमके कारण काय, याबाबत तर्क-वितर्क लावण्यात येत असल्याचे सांगितले जात आहे. बीड आणि परभणी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रकाश आंबेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घेतलेली भेट महत्त्वाची समजली जात आहे.

**प्रकाश आंबेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केल्या प्रमुख मागण्या**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट का घेतली, याबाबत प्रकाश आंबेडकर यांनी माहिती दिली आहे. परभणीत पोलिसांनी क्रूरपणे केलेल्या मारहाणीत बळी पडलेल्यांची यादी करून त्यांना पुरेशी भरपाई देण्याची आणि आदिवासी विद्यार्थ्यांसाठी डीबीटी रद्द करण्यासाठी सल्लामसलत करण्यासाठी, सर्वेक्षण करण्याची आमची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य केली आहे, असेही ते म्हणाले.

## धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यायला हवा अन् बीड पॅटर्न...; संभाजीराजे यांची मोठी मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८बीड**

राज्यभर गाजलेले सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण अन् हत्या प्रकरण आणि मस्साजोगशी संबंधित सर्व गुन्ह्यांचा तपास सीआयडीकडे गेला आहे. सीआयडीचे अधिकारी पीडित कुटुंबियांना न भेटताच गेल्यामुळे गावकरी आणि कुटुंबीय नाराज झाले आहेत. मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आल्यामुळे हे प्रकरण राज्यात गाजले. यानंतर महाविकास आघाडीसह विरोधकांनी या प्रकरणी महायुती सरकारवर हल्लाबोल केला असून, मनोज जरांगेंपासून ते अंजली दमानिया यांच्यापर्यंत अनेक जण बीडमध्ये भेटी देत आहेत. तसेच मोर्चेही काढले जात आहेत. यातच संभाजीराजे छत्रपती यांनी या प्रकरणी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यायला हवा, अशी मागणी केली आहे.



या प्रकरणी संभाजीराजे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली. संतोष देशमुख यांची क्रूर हत्या झाली, महाराष्ट्रामध्ये भीषण परिस्थिती झाली आहे. मला बोलायलाही लाज वाटते. महाराष्ट्राचे बीड झाले आहे, १९ दिवस झाले अजून अटक नाही, वाल्मिक कराड बेपत्ता आहे. अशी प्रकरण राज्याला परवडणारे आहे का, बीडमध्ये जे चालले आहे ते तुम्हाला पटते का, बीडची गुन्हेगारी पाहून मी चकित झालो, स्वत: मुंडे यांचा हातात बंदुक घेऊन फोटो आहे, हे काय दहशत माजवण्याचा प्रकार आहे का? त्यांना मंत्रिपद देऊ नका असे माझे म्हणणे होते. धनंजय मुंडे यांना वाल्मिक कराड कुठे आहे, हे माहिती नसणे हे पटणारे नाही. मुंडेंचा राजीनामा घ्यायलाच हवा, अशी मागणी संभाजीराजे यांनी केली.

**राज्यात हा बीड पॅटर्न कुठे होऊ नये**

अजितदादा परखड म्हणता मग त्यांना संरक्षण देताय, ते तुम्हाला पटतेय का, महाराष्ट्रमध्ये काय चालले आहे. मुख्यमंत्र्यांना विनंती आहे कौशल्य दाखवा, खऱ्या आरोपीला अटक करून दाखवा. कराड याला संरक्षण देणारे तिथले मंत्री यांची हकालपट्टी का झाली नाही? त्यांचा राजीनामा का घेतला नाही? हा आमचा सवाल आहे. राज्यात हा बीड पॅटर्न कुठे होऊ नये याची दक्षता मुख्यमंत्री आणि गृहमंत्र्यांनी घ्यावी. सरपंचाची हत्या होत आहे. आरोपींचा थेट संबंध दिसून येतो. त्यांचा कंपनीत भागीदारी आहे, त्यांचे सातबारा पुढे आले आहे, या शब्दांत संभाजीराजे यांनी निशाणा साधला.

## 'आप'च्या महिला सन्मान योजनेवरून वादंग; एलजीकडून तपासाचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सत्ताधारी आम आदमी पार्टीने महिला सन्मान योजना सादर केली आहे. मध्य प्रदेश व महाराष्ट्र सरकारच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील सरकारने सादर केलेली ही योजना वादात अडकली आहे. या योजनेवरून दिल्लीत मोठा संभ्रम निर्माण झाल्याचं दिसत आहे. एकीकडे सरकारकडून या योजनेसाठी महिलांची नोंदणी केली जात असताना दुसरीकडे सरकारच्याच महिला व बालकल्याण विभागाने म्हटलं आहे की अशी कोणतीही योजना राबवली जात नाहीये. काँग्रेस व भारतीय जनता पार्टीने या योजनेबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. तर, दिल्ली प्रशासनाने



यासंदर्भात जाहिरात प्रसिद्ध करून म्हटलं आहे की दिल्ली सरकारने अशी कोणतीही योजना जाहीर केलेली नाही. दरम्यान, दिल्लीचे राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांनी याप्रकरणी तपास करण्याचे आदेश दिले आहेत.

## दीड लाख तंबू, १२४९ किमी पाइपलाइन.. 'यूपी'तील कुंभमेळ्याचं मेगा नियोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८प्रयागराज**

उत्तर प्रदेश भारतातील सर्वात मोठं राज्य. अयोध्या, मथुरा अन् वाराणसी अशी धर्मक्षेत्रे याच राज्यात आहेत. आता तब्बल १२ वर्षांनंतर सर्वात मोठा धार्मिक मेळा म्हणजेच कुंभमेळा प्रयागराजच्या भूमीवर होत आहे. प्रयागराज शहरातील त्रिवेणी संगमाच्या ठिकाणी या मेळा होत आहे. देश विदेशातून कोट्यावधी भाविक येथे हजेरी लावणार आहेत. या धार्मिक उत्सवाची मोठी तयारी उत्तर प्रदेश सरकारकडून



करण्यात येत आहे. या मेळ्यासाठी सरकारने काय नियोजन केलं आहे

उत्तर प्रदेशातील प्रयागराज जिल्ह्यात १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळ्यात देश विदेशातून तब्बल ४३ कोटी तीर्थयात्री येतील असा अंदाज आहे. कुंभमेळा हा जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळा असून प्रयागराज, हरिद्वार (उत्तराखंड), नाशिक (महाराष्ट्र) आणि उज्जैन (मध्य प्रदेश) या ठिकाणी आयोजित होतो. यंदा तब्बल बारा वर्षांनंतर प्रयागराजमध्ये कुंभमेळा होत आहे.

**कुंभमेळ्याची जय्यत तयारी**

उत्तर प्रदेश सरकारने या मेळ्याची जय्यत तयारी सुरू केली आहे. मुलभूत सुविधांसाठी साडेपाच हजार कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. तब्बल चार हजार हेक्टर क्षेत्रावर मेळा मैदाने तयार केली जात आहेत. या ठिकाणी भाविकांसाठी राहण्याची व्यवस्था केली जाणार आहे. १ लाख ६ हजार तंबू, ४०० किलोमीटरचे तात्पुरते रस्ते, ३० पुलांची निर्मितीचे काम प्रगतिपथावर आहे.

## राजेश खन्ना यांची अजरामर कलाकृती 'आनंद' मराठीत; चित्रपटाची रविवारी घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

सन १९७१ मध्ये प्रदर्शित झालेल्या हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित 'आनंद' या हिंदी चित्रपटाने रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. या चित्रपटात राजेश खन्ना यांनी साकारलेला आनंद मृत्यूनंतरही रसिकांच्या मनात अजरामर झाला. यातील अमिताभ बच्चन यांची भूमिकाही खूप गाजली. त्यामुळेच आजही हा चित्रपट टीव्हीवर लागल्यास प्रेक्षक आवडीने पाहतात. रसिकांचा लाडका 'आनंद' आता मराठमोळे रूप लेऊन समोर येणार आहे. विघ्नहर्ता फिल्म्सने मराठी भाषेत 'आनंद' चित्रपट बनवण्याचे शिवधनुष्य उचलले आहे. २९ डिसेंबर (रविवार) या राजेश खन्ना यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधत मराठी 'आनंद' चित्रपटाची घोषणा करण्यात येणार आहे.

विघ्नहर्ता फिल्म्सच्या बॅनरखाली निर्माते दिलीप शेट्टी या चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. आजवर नेहमीच संगीतप्रधान आशयघन चित्रपटांचे दिग्दर्शन करणारे हेमंतकुमार महाले या




चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहेत. वाद्यवृंद जगतात 'शोमॅन ऑर्गनायझर' म्हणून जगविख्यात असलेले हेमंतकुमार महाले यांच्या 'काळी माती' या चित्रपटाला एका वर्षात ४४४ उत्कृष्ट राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून त्यातील १०६ पुरस्कार हे केवळ दिग्दर्शनासाठी आहेत. याची दखल 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड', 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड' आणि 'वर्ल्ड रेकॉर्ड युनिव्हर्सिटी'ने घेतली आहे.

'आनंद'मध्ये मराठी रसिकांच्या आवडीनिवडी आणि बदललेल्या काळानुरूप काही बदल करण्यात येणार असले तरी मूळ गाभा तसाच ठेवण्यात येणार आहे. हिंदी चित्रपट जिथे संपला त्याच्या पुढेही मराठी 'आनंद' जाणार असल्याचे संकेत दिग्दर्शक हेमंतकुमार महाले यांनी दिले आहेत. ते म्हणाले की, कुसुमाग्रजांचे संवाद आणि कवितांचा योग्य वापर चित्रपटात करण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून 'आनंद'चा लूक बदलला जाईल. सुमधूर संगीताची नेत्रसुखद नृत्यासोबत सांगड घातली जाईल. कथानकातील गाण्यांच्या जागा बदलून मराठी चित्रपटाचे नावीन्य जपण्यात येईल. काही नवीन व्यक्तिरेखा आणि दृश्यांचा समावेशही केला जाईल. 'आनंद'च्या नायिकेचे सादरीकरण सरप्राईज पॅकेज ठरेल. चित्रपटाच्या शेवटी एक उत्कंठावर्धक दृश्य वाढवण्यात येणार आहे. याखेरीज नयनरम्य लोकेशन्सवर 'आनंद'चे चित्रीकरण करण्यात येणार असल्याचे महाले यांनी सांगितले.

## अजितदादांची राष्ट्रवादी काँग्रेस दिल्ली विधानसभेच्या मैदानात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या रणसंग्रामात अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष उतरला आहे. पक्ष येथील निवडणूक लढवत आहे. मेघालयानंतर आता दिल्लीच्या मैदानात अजितदादा नशीब आजमावत आहे. त्यासाठी अजितदादांनी ११ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

**पहिल्या यादीत ११ उमेदवार**

दिल्ली विधानसभा निवडणूक २०२५ साठी राष्ट्रवादी काँग्रेसने ११ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. त्यात बुराडी येथून रतन त्यागी, बादली मतदारसंघातून मुलायम सिंह, मंगोल पूरी येथून खेम चंद, चांदनी चौकातून खालीद उर रहमान, बल्लीमारन येथून मोहम्मद हारून, छतरपूर येथून नरेंद्र तंवर, संगम विहार मतदार संघातून कमर अहमद, ओखला येथून इमरान सैफी, लक्ष्मी नगर मतदार संघातून श्री नमा, सीमा पूरी मतदारसंघातून राजेश लोहिया, गोकल पूरी येथून जगदीश भगत यांना मैदानात उतरवले आहे.

## संपादकीय ......

# शिंदेंना हवे तेच मिळाले

*खातेवाटप झाल्यानंतर आता पक्षांतर्गत आणि बाह्य राजकारणाला दुय्यम ठेवून सरकारने आता लोकांच्या प्रश्नांकडे पहायला हवे. महाराष्ट्र राज्यासमोरील आव्हाने वाढली असताना पक्ष किंवा नेत्यांबाबत लोकांमध्ये संशयाचे वातावरण असताना त्याचा परिणाम सरकारच्या धोरणांवर होता कामा नये. मात्र अजूनही पालकमंत्रीपदाचं काही ठरत नसल्यामुळे अस्वस्थता कायम आहे. तरीही अर्धेअधिक राजकारण स्थिर होण्यास उशीरच झाल्याने सरकारच्या पहिल्याच हिवाळी अधिवेशनातून ठोस काही निष्पन्न झालेले नाही. हिंसा, आंदोलने, परप्रांतीय मराठी वाद, अत्याचार आणि हत्येच्या घटनांना वेळीच हाताळताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची कारभाराच्या सुरुवातीलाच कसोटी लागणार आहे. स्पष्ट बहुमत मिळाल्याने अंतर्गत राजकारणाचा धोका राज्यातील सत्तेला आहे, खातेवाटपावरून झालेल्या रुसव्याफुगव्याने हे स्पष्ट केले आहे. येत्या काळात क्षीण झालेल्या विरोधकांपेक्षा अंतर्गत आणि मित्रपक्षांच्या राजकारणाला सरकारला तोंड द्यावे लागणार आहे. विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे दबावतंत्र यशस्वी झाल्याचे म्हटले जात आहे. खातेवाटप होत असताना एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोघांनीही 'महाबहुमत' मिळवलेल्या भाजपच्या तुलनेत आपले पारडे हलके राहणार नाही, याची व्यवस्थित काळजी घेतली. भाजपनंतर दुसर्या क्रमांकाची महत्त्वाची खाती शिवसेनेने आपल्याकडे ठेवण्यात यश मिळवले आहे. विशेष करून शिंदे यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाण्यात येऊ घातलेले प्रकल्प तडीस नेण्यासाठी त्यांच्या ताब्यात आलेली खाती शिंदेंसाठी महत्त्वाची ठरली आहेत. 'नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम' याशिवाय 'एमएमआरडीए, सिडको' या मोठे निर्मितीमूल्य असलेल्या संस्थांवर एकनाथ शिंदे यांचे वर्चस्व राहणार आहे. त्यामुळे ठाणे जिल्हा आणि परिसर अशा त्यांच्या बालेकिल्ल्यात येऊ घातलेल्या आणि काम सुरू असलेल्या प्रकल्पांवरही शिंदे यांचे नियंत्रण राहील. त्यामुळे त्यांचे सरकारमधील 'वजन' कायम राहील.*

*दुसरीकडे राज्यातील पालिका, नगर परिषदा, महानगरपालिकांच्या निधीबाबतही एकनाथ शिंदे यांच्या निर्णयाला महत्त्व येणार आहे. राज्याचे दुसरे उपमुख्यमंत्री आणि सत्तेतील मित्र अजित पवार यांच्याकडे वित्त विभाग सोपवला गेला आहे. राज्याच्या तिजोरीच्या चाव्या अजित पवार यांच्याकडे आहेत, परंतु शहर किंवा पालिका क्षेत्रांच्या विकासाचे अधिकार एकनाथ शिंदे यांच्याकडेच आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारमधील घटक पक्षांमधील सत्तेचे संतुलन राखण्याचा यशस्वी प्रयत्न करताना कोणालाही झुकते माप मिळणार नाही, याचीही दक्षता घेतली आहे. लवकरच महापालिकांच्या निवडणुका होणार असल्याने एकनाथ शिंदे यांच्या पदरात पडलेली खाती त्यांच्यासाठी राजकीयदृष्ट्याही फायद्याची आहेत. या माध्यमातून ठाकरेंच्या शिवसेनेची कमी झालेली ताकद वाढवण्याच्या विरोधकांच्या प्रयत्नांनाही एकनाथ शिंदे यांना नियंत्रणात आणता येणार आहे. एकनाथ शिंदे यांनी गृहविभागाचा आग्रह धरला होता, परंतु हे खाते भाजपच्या राजकीय नियंत्रणासाठी 'महत्त्वाचे' असल्याने भाजप त्यावर पाणी सोडणार नाही, हे स्पष्ट होतेच. दुसरीकडे फडणवीस यांच्या याआधीच्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातही गृहखाते त्यांनी स्वत:कडेच ठेवले होते. त्यामुळे या विभागाचे 'महत्त्व' भाजप जाणून आहे. अशा परिस्थितीत तडजोड म्हणून एकनाथ शिंदे यांच्याकडे आलेली नगरविकास, गृहनिर्माण, बांधकाम विभाग अशी 'निर्माणा'ची खातीही मोलाचीच आहेत. दुसरीकडे अजित पवार यांच्याकडे गृहविभागाची धुरा सोपवली असती तर शिंदे यांना फडणवीसांच्या तुलनेत राजकीय अडचण होण्याची शक्यता होती. गृहविभाग फडणवीसांकडेच असल्याने तो प्रश्न आता उरलेला नाही, त्यामुळे शिंदे यांचे दबावतंत्र यशस्वी झाले, असेच म्हणावे लागेल.*

*जरी शिंदे यांना अजित पवारांच्या वित्त विभागावर अवलंबून राहावे लागणार असले तरी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दरबारी उपमुख्यमंत्री शिंदे यांचा 'शब्द' आजही 'मोलाचा' आहे. मुख्यमंत्री फडणवीस आपला शब्द खाली पडू देणार नाहीत, हे शिंदे जाणून आहेत. मुंबई किंवा ठाणे परिसरातील महापालिकांच्या निवडणुकीत उद्धव ठाकरेंना शह देण्यासाठी भाजपला शिंदेंची गरज आहे, त्यामुळे त्यांचे महत्त्व वादातीत आहे. शिंदे स्वत:चे महत्त्व चांगलेच ओळखून आहेत.*

# सुपर स्पेशालीटीतील शिबिरात ५५ जणांचे रक्तदान



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती–**

विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल येथे आज दि. २७ डिसेंबर रोजी रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबीरात ५५ जणांनी रक्तदान केले.



रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. अमोल नरोटे आणि विशेष कार्यकारी अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांनी शिबिराचे आयोजन केले. शिबिरामध्ये रुग्णालयातील अधिकारी, कर्मचारी आणि खासगी वैद्यकीय संस्थेतील विद्यार्थी, विदर्भ आयुर्वेद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

शिबिरासाठी महात्मा ज्योतिराव फुले आरोग्य योजना विभाग प्रमुख डॉ. श्याम गावंडे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. माधव ढोपरे, डॉ. विक्रांत कुळमेथे, परिसेविका अलका जवंजाळ, वैद्यकीय समुपदेशक दिनेश हिवराळे, मुकादम श्रीकांत ढेंगे, विक्रांत येते यांनी सहकार्य केले. जिल्हा सामान्य रुग्णालय रक्तपेढी अंतर्गत डॉ. अविनाश उकंडे, रक्त संक्रमण अधिकारी डॉ. राहुल खराटे, रक्त संक्रमण अधिकारी मिलिंद तायडे, जनसंपर्क अधिकारी संगिता गायधने, मंगेश उमप, प्रविण कळसकर यांनी रक्त संकलनाचे कार्य पाडले.




# पोट साफ होत नाही?

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

चुकीच्या खाण्यापिण्याच्या सवयींमुळे पोटाच्या तक्रारी जाणवणे ही सामान्य बाब झाली आहे. पोटात गॅस होणे, बद्धकोष्ठता, पोट फुगणे, अपचन, ॲसिडिटी या तक्रारी आता रोजच्या रूटीनसारख्या झाल्या आहेत. सकाळी अनेकजणांना पोट साफ न होणे ही रोजची डोकेदुखी झाली आहे, ज्यामुळे संपूर्ण दिवसावर याचा परिणाम होत आहे. अशावेळी पोटाचे आरोग्य निरोगी राहण्यासाठी किंवा पोट साफ होण्यासाठी आतड्यांचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. आतड्या निरोगी ठेवण्यासाठी तुम्हाला काही घरगुती ड्रिंक्स उपयुक्त ठरतील. चला तर मग जाणून घेऊयात, तुम्ही कोणत्या ड्रिंक्स प्यायला हव्यात,



**मीठाचे पाणी** –पोट साफ होत नसेल तर तुम्ही मीठाचे पाणी प्यायला हवे. मीठाचे पाणी प्यायल्यावर पोट साफ होण्यास मदत मिळते. यामुळे पचनात अडथळा ठरणारे विषारी पदार्थ बाहेर फेकले जातात आणि पोट साफ होते.

ॲपल सायडर व्हिनेगर आणि मध –

ॲपल सायडर व्हिनेगर आणि मधामध्ये प्रोबायोटिक्स संयुगे असतात, ज्यामुळे आतड्यांवर सकारात्मक परिणाम होतो आणि आतडे निरोगी राहतात. परिणामी, वेळते शौचालय होण्यास सुरूवात होते.

**मसालेदार लिंबूपाणी** – मसालेदार लिंबूपाणी प्यायल्याने शरीर डिटॉक्स होते. तुम्हाला वारंवार पोटाच्या तक्रारी जाणवत असतील तर काही दिवस मसालेदार लिंबूपाणी प्यायला हवे.

**आल्याचा चहा** –पोट निरोगी राहण्यासाठी जेवणाच्याआधी गरम आल्याचा चहा प्यायला हवा. आल्याचा चहा प्यायल्याने जळजळ, पोटदुखी, अपचन सारख्या समस्या उद्भवत नाही.

**गवती चहा** –गवती चहा प्यायल्याने पचनसंस्था सुरळीत काम करू लागते. ज्यामुळे पोट फूगणे, ॲसिडिटी, अपचन, बद्धकोष्ठतेसारख्या तक्रारी जाणवत नाही. गवती चहामध्ये असल्याने सिंट्रेक संयुग असते, जो दाहकविरोधी गुणधर्माने परिपूर्ण असतो. ज्यामुळे पोटात गॅस निर्माण होत नाही.

# ई–पीक पाहणी करताना बांधावरची झाडे कशी नोंदवाल? पाहूया सविस्तर

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

ई–पीक पाहणी ही राज्य शासनाद्वारे सुरु करण्यात आलेली एक नवीन आणि डिजिटल पद्धत आहे ई पीक पाहणी च्या माध्यमातून शेतकरी आपल्या शेतातील पिकांची नोंदणी ई पीक पाहणी ॲप च्या सहाय्याने स्वतः करू शकतात. यापूर्वी पिकांची नोंदणी तलाठी या सरकारी अधिकाऱ्याद्वारे करण्यात येत होती. मात्र, ई–पीक पाहणीच्या माध्यमातून ह्या सर्व प्रक्रिया ऑनलाइन आणि मोबाईल ॲप च्या सहाय्याने पार पाडली जाते.

ई पीक पाहणीमध्ये आपण शेतातील विविध घटकांची नोंद करू शकतो त्यात आपल्या शेताच्या बांधावरील झाडांचीही नोंद करता येते. ई पीक पाहणी ॲप च्या सहाय्याने बांधावरची झाडे नोंदवतात ते पाहूया.

शेतकऱ्याला सर्वात प्रथम Google Play Store वर जावे लागेल व E-Pik Pahani ई–पीक पाहणी ॲप Install करायचा आहे.

ॲप Install झाल्यावर तो जशिप करायचा आहे.आता तुम्हाला तुमच्या मोबाईल मधील Photo आणि Media च्या access साठी Permission मागेल त्यासाठी allow वर क्लिक करायचे आहे.

आता तुम्हाला तुमच्या चे–लळश्रश च्या Location साठी Permission द्यावे लागेल त्यासाठी While Using This app ad क्लिक करावे लागेल. आता तुम्हाला फोटो आणि विडिओ साठी Permission द्यावे लागेल त्यासाठी While Using This app क्लिक करावे लागेल.

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला तुमचा विभाग निवडायचा आहे.

तुमच्या विभागाची निवड केल्यावर Right arrow वर क्लिक करायचे आहे.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला लॉगिन पद्धत निवडायची आहेत त्यासाठी तुम्हाला शेतकरी म्हणून लॉगिन करा वर क्लिक करायचे आहे.आता तुम्हाला तुमचा मोबाईल क्रमांक टाकून पुढे जा बटनावर क्लिक करायचे आहे.



आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला तुमचा जिल्हा, तालुका व गावाची निवड करायची आहे व Right arrow वर क्लिक करायचे आहे.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला तुमचे खाते शोधायचे आहे तुम्ही तुमचे पहिले नाव, मधले नाव, आडनाव, खाते क्रमांक, गट क्रमांक टाकून खाते शोधू शकता. तुम्ही निवडलेल्या पर्यायानुसार माहिती भरा आणि शोध बटनावर क्लिक करा.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला खातेदार निवड मध्ये तुमच्या खातेदाराची निवड करायची आहे आणि Right arrow वर क्लिक करायचे आहे.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला खातेदाराचे नाव व खाते क्रमांक दिसेल आता तुम्हाला तुमच्या खाते क्रमांकाची निवड करायची आहे आणि Right arrow वर क्लिक करायचे आहे.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला तुमचा मोबाईल क्रमांक दिसेल तुमचा मोबाईल क्रमांक योग्य असल्याची खात्री करून घ्या व तो योग्य असल्यास पुढे वर क्लिक करा (जर तुमचा मोबाईल क्रमांक चुकीचा असेल किंवा तो बदलायचा असेल तर मोबाईल क्रमांक बदला वर क्लिक करून तो बदलून घ्या.)

आता तुम्हाला एक मेसेज दिसेल तुमची नोंदणी आधीच झालेली आहे. तुम्हाला पुढे जायचे आहे का? तुम्हाला होय वर क्लिक करायचे आहे.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला खातेदाराचे नाव निवडायचे आहे आणि तुमचा सांकेतांक टाकायचा आहे. (जर तुम्ही तुमचा सांकेतांक नंबर विसरला असाल तर सांकेतांक विसरलास? वर क्लिक करा तुम्हाला तुमचा सांकेतांक दिसेल.)

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला बांधावरची झाडे नोंदवा वर क्लिक करायचे आहे.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला विचारलेली सर्व माहिती भरायची आहे आणि Right arrow बटनावर क्लिक करायचे आहे.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्हाला तुम्ही भरलेली सर्व माहिती दिसेल ती अचूक असल्याची खात्री करायची आहे व सर्व माहिती अचूक असल्यास पुढे बटनावर क्लिक करायचे आहे.

आता तुमची माहिती अपलोड झाल्याचा एक मेसेज दिसेल (झाडांची माहिती साठवली आणि अपलोड झाली आहे.) त्यामध्ये ठीक आहे वर क्लिक करायचे आहे.

आता तुमच्यासमोर एक नवीन पेज उघडेल त्यामध्ये तुम्ही बांधावरच्या झाडांची भरलेली माहिती पाहू शकता किंवा त्यामध्ये बदल करू शकता किंवा ती नष्ट करू शकता.

# सी. ए च्या परीक्षेत आनंद शर्मा यांचे सुयश

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती –** नुकत्याच पार पडलेल्या C.A च्या परीक्षेमध्ये यवतमाळ येथील आनंद सुशील शर्मा याने विशेष प्राविण्य प्राप्त केले.आनंद हा अमरावती शहरातील उच्चशिक्षित शर्मा कुटुंबातील प्रसिध्द वकील दिवंगत जुगलकिशोर शर्मा यांचा नातू आणि यवतमाळ येथील अँड. सुशील शर्मा आणि निलिमा शर्मा यांचा सुपुत्र आहे.त्यांनी प्राप्त केलेल्या या यशाबद्दल त्याची आजी प्रभावती जुगलकिशोर शर्मा आजोबा स्टेट बँकेतील सेवानिवृत्त एजीएम पुरुषोत्तम शर्मा आणि स्टेट बँकेतील सेवानिवृत्त डीजीएम नवल किशोर शर्मा, जयकिशन शर्मा आणि मामा रवींद्र शर्मा, हेमंत शर्मा व बहीण अपूर्वा आणि समस्त शर्मा परिवार अमरावती तर्फे त्याचे कौतुक करून त्याला शुभेच्छा दिल्या आहे.आनंदच्या या यशाबदल त्यांचे वाणिज्य क्षेत्रातील तज्ञानी विशेष कौतुक आणि अभिनंदन केले.



# मालमत्ताधारकांना मालमत्ता कर भरणा करण्याबाबत कोणतीही तक्रार व मदत लागल्यास महानगरपालिकेच्या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती–**

मालमत्ता कर भरण्यास नागरिकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. शहरातील मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन अमरावती महानगरपालिकेने केले आहे.

अमरावती महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांच्या मालमत्ता कर ऑनलाईन भरण्या करिता महानगर पालिकेची वेबसाईट www. amravati corpo ration. in तथा www.amrava timc.in व amravatimc. org या संकेत स्थळावर विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच मालमत्ता कर धारकांना मालमत्ता कर भरणा करण्याबाबत कोणतीही तक्रार व मदत लागल्यास कृपया (१८००–२६८–२९०१), (१८००–८३३–२७००) या टोल फ्री क्रमांका वर संपर्क साधावा अथवा helpdesk. amr avatim cgmail.com या इमेल आय.डी. वर मेल करावे असे आवाहन अमरावती महानगरपालिकेने केले आहे.



RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शनिवार दि. २८ डिसेंबर २०२४

शहर/ग्रामिण


# रवी राणा यांची मोठ्या पदावर वर्णी लागणार?

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले संकेत

### मुख्यमंत्री निवासस्थानी बोलावून एक ते सव्वा तास चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८ अमरावती–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी २७ डिसेंबर रोजी आमदार रवी राणा यांना आपल्या निवासस्थानी बोलावून घेतले. यावेळी मुख्यमंत्री यांनी रवी राणा यांना मोठ्या पदावर वर्णी लागणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले. एक ते सव्वा तास अमरावती जिल्ह्यातील प्रलंबित प्रकल्प व ज्वलंत प्रश्नावर संमिश्र चर्चा झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुर्ण ताकदीने जिल्ह्यातील प्रलंबित प्रश्न, जिल्ह्यातील विकासाचे विषय आदिवासी, महिला, शेतकरी, शेतमजुर, वंचित घटकांच्या युवक–युवती, दिव्यांग तसेच विविध घटकातील लोकांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी



मुख्यमंत्री पुर्णपणे आमदार रवी राणा यांच्या सोबत असणार आहे. जिल्ह्यातील अतिशय महत्वाचे ग्रामीण आणि शहरातील प्रकल्प ,विकास कामाचे प्रस्ताव शासनाच्या कडे प्रस्तावित आहे. यावर आ.रवी राणा यांनी मुख्यमंत्र्यासोबत चर्चा केली.विशेषतः बेलोरा एअरपोर्ट, पीम मित्रा मेगा टेक्सटाईल पार्क, अमरावती–परतवाडा–धारणी ते खंडवा राज्यमार्गला राष्ट्रीय महामार्गचा दर्जा देण्यात यावा, मोर्शी येथील हिवरखेड संत्रा प्रक्रिया केंद्र आणि चिखलदरा येथील स्कायवॉक समवेत इतर प्रलंबित विकास प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घातले. यावर विदर्भ सुपुत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक उत्तर दिले. लवकरच अमरावती (बेलारा) विमानतळा वरून नियमित विमान वाहतूक सुरू होणार आहे. जेणेकरून अमरावती जिल्ह्यातील औद्योगिक विकासाला देखील पंख लागणार आहे. लवकरच हे अतिमहत्वाचे प्रकल्प, प्रस्ताव आजच्या या बैठकीच्या माध्यमातून पुर्णत्वास जातील. तसेच जिल्हाच्या सर्वांगीण विकासासाठी मोठे निर्णय घेणार असल्याचे देखील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवर्जून सांगितले. सोबतच आमदार रवी राणा यांना मोठी जबाबदारी मिळणार आणि जिल्ह्याला लवकरच गोड बातमी मिळणार.हे मात्र नक्की.

## शिव परिवाराची भाऊसाहेबांना आदरांजली, डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती –** भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनामुळे श्री शिवाजी शिक्षण संस्थेने शिक्षणमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२६ व्या जयंतीचा मुख्य सोहळा रद्ध करून स्मृती भवन येथील डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पचक्र अर्पण केले व आदरांजली वाहिली आणि त्याच परिसरात शोकसभा घेऊन माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांना श्रद्धांजली अर्पण केली.शिक्षणमहर्षी भाऊसाहेब उपाख्य डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२६ व्या जयंतीचा मुख्य सोहळा शुक्रवारी (ता. २७) सकाळी नऊ वाजता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यात ना. गडकरी यांना 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार होते सोबतच विदर्भातील दोन उत्कृष्ट शेतकरी महिलांना या सोहळ्यात पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार होते परंतु काल रात्री माजी पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांच्या निधनामुळे राष्ट्रीय शोक जाहीर झाल्याने संस्थेने आजचा मुख्य कार्यक्रम रद्ध करण्याचा निर्णय घेतला.शुक्रवारी सकाळी ८ वाजता डॉ. पंजाबराव देशमुख स्मृतीस्थळावरील भाऊसाहेबांच्या पूर्णाकृती पुतळ्याला संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख, उपाध्यक्ष ॲड. गजाननराव पुडकर, ॲड. जे. केशवराव मतेकर, कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ , प्राचार्य केशवराव गावंडे, सुरेशराव खोटरे, प्रा. सुभाषराव बनसोड. सचिव डॉ.वि.गो.ठाकरे, स्वीकृत सदस्य प्राचार्य डॉ. अंबादास कुलट, नरेशचंद्र पाटील, डॉ.पुरुष– त्तिम वायाळ, डॉ. अमोल महल्ले आणि उपस्थितांनी पुष्पचक्र वाहून आदरांजली अर्पण केली. माजी मंत्री वसुधाताई देशमुख, आमदार सुलभाताई खोडके, राष्ट्रवादीचे नेते संजय खोडके यांनीही स्मृतिस्थळ येथे भेट आदरांजली अर्पण केली.त्या नंतर याच परिसरात संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षतेत श्रद्धांजली सभा घेण्यात येऊन दिवंगत माजी पंतप्रधान मनमोहनसिंग यांना दोन मिनिटे मौन पळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या सभेला संस्थेतील सर्व अधिकारी, कर्मचारी, संस्थेचे आजीव सदस्य, नागरिक उपस्थित होते.

# विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेतून ४७ विद्यार्थी राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी पात्र

## मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा पुरस्कार देऊन गौरव

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये नुकत्याच पार पडलेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत विविध वर्गवारीमधून ४७ विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या सर्व विद्यार्थी, विद्यार्थीनींना समारोप समारंभामध्ये मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

आविष्कार स्पर्धेचा समारोप समारंभ २४ डिसेंबर रोजी संपन्न झाला. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्रमुख अतिथी म्हणून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठा च्या माजी कुलगुरू डॉ. मृणालिनी फडणवीस, नवोपक्रम , नवसंशोधन व साहचर्य संचालक डॉ. अजय लाड, अविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. वैशाली धनविजय, आयोजन सचिव डॉ. गजानन मुळे उपस्थित होते. आविष्कार स्पर्धेत ह्युमॅनिटीज, लँग्वेज ॲन्ड फाईन आर्ट वर्गवारीमध्ये आयेशा शेख, वेदांत भेंडकर, नेहा मापारी, रोहिनी राठोड, शेख उमराशुमयम अंसार अहेमद, कुंजन जवंजाळ, पंढरी गोरे व संगिता गुडधे, कॉमर्स, मॅनेजमेंट ॲन्ड लॉ वर्गवारीमध्ये प्रशांत भोयर, प्रभव कलांगे, प्रवीण चोरखोड, गायत्री देशमुख, रोहण बुंदेले, अक्षय देशमुख व सौरभ वगारे, प्युअर सायन्स वर्गवारीमध्ये पियूष चौधरी, कु. रेणुका नळे, यश लवणकर, प्रणव झोरे, श्रावणी बागवे, अर्पिता जिसकार, वैभव ढवळे व हर्षा देशमुख, ॲग्रीकल्चर ॲन्ड ॲनिमल हस्बन्डरी वर्गवारीमध्ये



ऋषिकेश देविकर, सिध्दी ठाकुर, साहिल गावंडे, साक्षी चावट, गायत्री टेकाडे, स्नेहल हेटे, कल्पेश देशमुख व हेमंत मळेकर, इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी वर्गवारीमध्ये राम रोडे, तेजस काळे, संगम पारधी, मानसी करनाडे, सुमेर तिवारी, श्रीयस रुल्हे, विवेक टोंगे व रुपाली काळे, मेडिसीन ॲन्ड फार्मसी वर्गवारीमध्ये शुभम राठोड, लक्ष्मी मुळ्ये, आयुषी झोपे, साक्षी केचे, निकिता तेलरांधे, भाग्यश्री आउटी, सचिन बोरीकर व समिता रक्षित हे विजयी ठरले. समारंभात कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते तसेच मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थी, विद्यार्थीनींना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. सर्व पात्र विद्यार्थी, विद्यार्थीनी कोंकण येथे होणा–या राज्यस्तरीय आविष्कार स्पर्धेत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे नेतृत्व करणार आहेत. सर्व विजयी विद्यार्थ्यांना मान्यवरांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्यात.


# ५ जानेवारी रोजी विदर्भस्तरीय एकल भक्तीगीत गायन स्पर्धा

## बक्षिसांची लयलूट, मंजुळा माता महोत्सवानिमित्त आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि२८गुरुकंज मोझरी** राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या मातोश्री पूज्य मंजुळा माता यांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त भव्य विदर्भस्तरीय एकल भक्तीगीत गायन स्पर्धा ५ जानेवारी २०२५ रोजी स्मृती मंदिर गुरुकुंज आश्रम येथे आयोजित केली असून, यावेळी भव्य बक्षिसांची लय लूट होणार आहे.

स्पर्धेमध्ये पुरुष व महिला खुला गट तर बाल गटा असे दोन गट स्पर्धेसाठी असून पुरुष व महिला गटाकरता प्रथम बक्षीस ७ हजार रुपये वैशालीताई धूमोने सरपंच गुरुदेवनगर व अनिल डिक्कर ग्रामपंचायत सदस्य गुरुदेव नगर यांच्याकडून तर दिव्तीय बक्षीस ५ हजार रु. अभिषेक कासोदे गटविकास अधिकारी पं. स. तिवसा तर तृतीय बक्षीस तीन हजार रुपये दिलीप मा घुरडे उच्च श्रेणी मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा गुरुदेव नगर यांच्याकडून देण्यात येईल.तर बालगटात व दोन ते पंधरा वर्षापर्यंत प्रथम बक्षीस तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांच्या कडून ५ हजार रु. तर द्वितीय बक्षीस पोलीस निरीखक प्रदीप शिरस्कर यांच्याकडून ३ हजार रुपये तर तृतीय बक्षीस धनराज बारबुद्धे पत्रकार यांच्याकडून पंधराशे १५०० रुपये स्वर्गीय दौलतराव बारबुद्धेस्व. अंजनाबाई बारबुद्धे यांच्यास्मृती प्रित्यर्थ देण्यात येईल. प्रोत्साहनपर बक्षीसेसुध्दा देण्यात येणार आहे. स्पर्धेकरीता अभंग, भजन, गवळण, भक्तीगीत यापैकी कोणती एक गीत



म्हणता येईल. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांच्या भजनाला विशेष प्राधान्य देण्यात येईल.स्पर्धकाला गीत पाच मिनिटात पूर्ण करावे लागेल तबला व हार्मोनियम वादक मंडळ तर्फे पुरविण्यात येईल किंवा स्वतः आणले तरी चालेल तसेच बाल गटासाठी २ ते १५ वर्षापर्यंत मुलामुलींनी आधार कार्ड सोबत आणावे तरच प्रवेश दिला जाईल. स्पर्धकांनी आवश्यक शुल्क व्यरून प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन आकाशवाणी कलावंत धनश्री किरण खंडारे यांनी केले आहे.

# अमरावती–अकोला–वाशिम जिल्ह्यात पावसाची हजेरी



## आज वादळी वारा,पाऊस व गारपीट शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती** –डिसेंबर ऐन हिवाळ्यात अवकाळी पावसाचा तडाखा बसण्यास सुरुवात झाली आहे. अकोला आणि वाशिम जिल्ह्यात शुक्रवारी सकाळपासून रिमझिम पाऊस पडला. या पावसामुळे नागरिकांची तारांबळ उडाली. तर अमरावतीसह जिल्ह्यात शुक्रवारला सकाळपासून ढगाळ वातावरण होते. मात्र सायंकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास शहरातील बहुतांश भागात पावसाने हजेरी लावल्याने वातावरण पूर्णतः बदलून गेले आणि हिवाळ्याच्या दिवसात पावसाळ्याचा अनुभव आला. वातावरणातील बदलामुळे शेतातील पिके धोक्यात आली आहेत. भारतीय हवामान विभागाने जिल्ह्यात २७ व २८ डिसेंबर रोजी वादळी वारा, अवकाळी पाऊस व गारपीट होण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यानुसार गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात ढगाळ वातावरण तयार झाले. अमरावती शहरासह जिल्ह्यात शुक्रवारला सकाळपासून ढगाळ वातावरण होते. काही भागात तुरळक स्वरुपात पावसाचा तुषार सिंचन झाले. मात्र दुपारी १२ ते १२.३० वा. नंतर थोड्या फार प्रमाणात सूर्यदर्शन झाले. मात्र दुपारनंतर पुन्हा ढगाळी वातावरण निर्माण झाले. त्यानंतर सायंकाळी ६ ते ६.३० वा. दरम्यान अमरावती शहरातील काही भागात रिमझीम तर काही भागात तुरळक स्वरुपाच्या पावसाने हजेरी लावली होती. अकोला शहरासह जिल्ह्यातील विविध भागामध्ये सकाळी ७.३० होती. अमरिमझिम पाऊस पडण्यास सुरुवात झाली. दुपारी १२ वाजेपर्यंत हा पाऊस सुरूच होता. काही भागात पावसाने चांगलाच जोर पकडला. सकाळ पासून च पाऊस पडत असल्याने नागरिकांना अडचणीचा सामना करावा लागला.

# कांडली व अचलपूरमध्ये अवैध सावकारांच्या घरावर धाडी

## जिल्हा उपनिबंधक कार्यालयाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अचलपूर–** जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्याआदेशाने अचलपूर शहरात दोन ठिकाणी अवैध सावकारीच्या तक्रारीच्या अनुषंगाने धाडी टाकण्यात आल्या. याकरिता दोन



पथक तयार करण्यात आले होते. दोन्ही ठिकाणी कोरे धनादेश, करारनामे व दस्त जप्त करण्यात आले. त्याआधारे जिल्हा उपनिबंधक विभागाने दोन पथक तयार केले. पथक क्रमांक एकमध्ये दर्यापूर सहनिबंधक कार्यालयाचे के. एस.बालिंगे, ढोके, गडलिंग, सपकाळ वे कुन्हाडे यांनी रश्मी नगर कांडली येथील राजकुमार गुडघे यांच्या राहते घरी धाड टाकली. दस्त ऐवजा सोबतच काही करारनामे कोरे घनादेश व अन्य १३ दस्त जप्त करण्यात आले. त्याच पद्धतीने वरुड सहनिबंधक कार्यालयाचे ए. डी. चर्जन यांच्या नेतृत्वात मुळे, अरबट, कुकडे दहातोंडे यांनी जुना सराफा येथील रमे गुलाबचंद तांबी यांच्या राहत्या ठिकाण घाड टाकण्यात आली. त्या ठिकाण कोरे धनादेश, करारनामे व ३३ दस्त जा करण्यात आले. या धाडीकरिन अचलपूरचे सहाय्यक निबंधक पी. ए गुल्हाणे, मुख्य लिपिक पी. बी. म यांनी काम बघितले.–

# वाहनांना नवीन नंबर प्लेट बसविण्याचे आवाहन३१ मार्चपर्यंत मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८अमरावती,** : केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार राज्य शासनाने सर्व वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट बसविण्याची तरतूद केली आहे. त्यानुसार वाहनधारकांनी ३१ मार्च पूर्वी नंबर प्लेट बसवावी, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयातर्फे करण्यात आले आहे.जिल्ह्यासाठी एजंसी निश्चित करण्यात आली आहे. एचएसआरपी नंबर प्लेटसाठी बुकींग करण्यासाठी ावहीीी.लो पोर्टल निश्चित करण्यात आले आहे. वाहनधारकांनी पोर्टलवर बुकींग करून त्यांच्या सोईप्रमाणे अपॉइंटमेंट घेऊन एचएसआरपी नंबर प्लेट दि. ३१ मार्च २०२५ पूर्वी बसवून घेण्यात यावी. वाहनधारक अमरावती कार्यालयातील नोंदणीधारक नसला तरी अमरावतीमध्ये वाहन वापरत असल्यास वाहनास एचएसआरपी नंबर प्लेट बसविणे आवश्यक आहे.

एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी दुचाकी, ट्रॅक्टरसाठी ४५० रूपये, तीनचाकीसाठी ५०० रूपये, इतर सर्व वाहनांसाठी ७४५ रूपयांप्रमाणे जीएसटी वगळून शुल्क आकारण्यात येणार आहे.



वाहनधारकांना त्यांच्या वाहनावर एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याबाबत तक्रारी असल्यास संबंधित सेवापुरवठा धारकांच्या पोर्टल, तसेच अमरावती प्रादेशिक परिवहन कार्यालयात तक्रार दाखल करू शकतील.वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करून होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे, तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना एचएसआरपी बसविणे आवश्यक आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील वाहनधारकांनी वाहनांना एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्यासाठी सूचना देण्यात आल्या आहे.जिल्ह्यातील नागरिकांनी त्यांच्या वाहनावर एचएसआरपी नंबर प्लेट बसविली नसल्यास वाहनाचे मालकी हस्तांतरण, पत्ता बदल, वित्त बोजा चढविणे, उतरविणे, दुय्यम प्रत, विमा अद्यावत करणे आदी कामकाज थांबविण्यात येणार आहे. एचएसआरपी नंबर प्लेट नसलेली वाहने, बनावट एचएसआरपी नंबर प्लेट असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे, असे प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी कळविले आहे.–

# जिल्ह्यातील ९८९ गावे बनली ओडीएफ प्लस मॉडेल

## ५३९ गावांना मार्च २०२५ ची डेडलाइन, निवडणूक संपताच स्वच्छता विभाग लागला कामाला

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८अमरावती–** जिल्ह्यात स्वच्छ मिशन अंतर्गत १५२८ गावांना ओडिएफ प्लस मॉडेल करण्याचे उद्दिष्ट असून वर्षभरात यातील ९८९ गावे ओडिएफ प्लस मॉडेल बनली आहे. शिल्लक ५३९ गावे असून येत्या मार्च २०२५ पर्यंत या गावांनासुद्धा ओडिएफ प्लस मॉडेल बनवण्याकरिता डेडलाईन देण्यात आली आहे. निवडणूक संपल्यानंतर आता स्वच्छता विभाग पुन्हा एकदा जिल्हा ओडिएफ प्लस मॉडेल करण्याकरता कामाला लागला आहे.प्रत्येक गावात शौचालय करून जिल्हा हागणदारीमुक्त गेल्यानंतर आता स्वच्छता विभागाने गावातील स्वच्छता, घनकचराव्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, शोषखड्डे, शौचालयाचा नियमित वापर, परिसर स्वच्छ करणे आधी विविध उपक्रम राबवून ओडिएफ प्लस गावे केली तर या बाबींमध्ये नियमितता राबवण्याकरता आता ओडिया प्लसमॉडेल एक गाव करण्याचा निर्धार जिल्हा परिषदेच्या स्वच्छता विभागाने घेतला आहे. जिल्ह्यातील १५८८ गावांपैकी उजाड व पुनर्वसित गावे वगळता १५२८ गावांना ओडिएफ प्लस मॉडेल करण्याच्या उद्दिष्टसमोर ठेवले होते. वर्षभरात यातील ९८९ गावे ओडिएफ प्लस घोषित करण्यात आली आहे, तर ५३९ पैकी ४१० गावे ही ओडिएफ प्लस मॉडेल झाली असून ती घोषित करण्याच्या प्रक्रियेत आहेत. त्यामुळे उर्वरित ९३ गावावर आता विभागाने लक्ष केंद्रित केले आहे.त्यामध्ये ४३ गावांमध्ये सदरची प्रक्रिया निवडणुकीमुळे रखडली होती, ती देखील आता सुरू झाली आहे. येथे मार्च २०२५ पर्यंत संपूर्ण जिल्हा ओडिएफ प्लस मॉडेल करण्याकरता आता स्वच्छता विभाग कामाला लागला आहे. सीईओ संचिता महापात्र यांच्या आदेशावरून उपमुख्य मुख्य कार्यकारी अधिकारी संजय खारकर यांच्या नेतृत्वात उर्वरित गावांमध्ये मिशन अंतर्गत कामाला गती देण्यात आली आहे.




# सर्व बसचे फिटनेस रामभरोसे

## अकोट – ढाकणा रोडवर बस पलटी

### प्रवासी फरार, चालक अहमद सुरक्षित



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८धारणी –** अकोट येथून धारणीकडे येताना बस क्र. एम.एच. ३०–ए.ए.६९०४ ढाकणा गावाजवळ गाडगा भांडूम नजीकच्या धारणी मार्गावर शुक्रवारी सकाळी पलटल्याने गंभीर अपघात घडून एकच खळबळ उडाली आहे. सुदैवाने एकाही प्रवाशाला धक्का लागला नाही, तर चालक अहमद पण सुखरूप आहे. मात्र, बसचे भयंकर नुकसान झाले आहे. धारणी–अकोट–धारणी मार्गावर अनेक बसेस चालतात. सर्व बसचे फिटनेस रामभरोसे असून नेहमी अपघात होत असतात. २७ डिसेंबरच्या सकाळी सावऱ्या गावालगत अपघात होऊन बसने पलटी काल्ली. गाडीतील सिटा आसनव्यवस्थापणतुटल्याने प्रचंड नुकसान झाले आहे. अपघाताचे नेमके कारण समजले नाही. तरी गाडी कालबाह्य व निरूपयोगी अवस्थेतील असल्याची माहिती आहे. धारणी–अकोट मार्गे ढाकणा व मार्गे रेल्वे धूळघाट चालणाऱ्या बसेसची फिटनेस सध्या चर्चेचा विषय आहे.

# नेरपिंगलाई आठवडी बाजारात हजारों चे मोबाईल लंपास

## नागरिकांमध्ये भितीचे वातावरण, ऐक महिन्याच्या अंतराणी चोरटे करतात मोबाईल लंपास

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८ नेरपिंगलाई–** नेरपिंगलाई गावात दर गुरवार आठवडी बाजारात हजारोंचे मोबाईल लंपासहोत असल्याने सामान्य नागरिक चांगलाच त्रस्त झालेला आहे.विशेष म्हणजेएक महिन्याच्या अंतराणी हे चोरटे आपलले काम फत्ते करतात.

नेरपिंगलाई गाव आजु बाजूच्या खेड्यांची बाजारपेठ असल्याने गावामध्ये दर आठवड्यात गुरवारी भाजीबाजार भरतो.या बाजारात अनेक आजू बाजूच्या खेड्या मधुन मोठ्या प्रमाणात नागरीक गावामद्ये जीवन उपयोगी वस्तू भाजीपाला खरेदी करण्या करीता



गावात येतात बाजारा मध्ये भरपूर प्रमाणात गर्दी राहत असल्याने गर्दीचा फायदा घेत चोरटे ग्राहकांच्या मोबाईल वर डल्ला मारत हजारो रुपयाचे वेग वेगळ्या कंपनी चे मोबाईल लंपास करतात गेल्या अनेक दिवसापासून मोबाईल चोरी गावात सतत सुर असुन कधी ऐक आठवड्या नंतर तर कधी महिन्या नंतर आनेक नागरिकांचे मोबाईल चोरी जात असुन दिनांक २६ ला सुद्धा गुरुवारी सुद्धा अनेक नागरिकांचे महागड्या किंमती चे मोबाईल चोरट्यांनी लंपास केले अनेक दिवसा पासुन गावात चोरी चे सत्र सूरू असल्याने हे चोरटे नागरिकांच्या घरा कडे मोर्चा तर वळवणार नाही ना? अशी चर्चा आता गावात ऐकायला मिळत असल्याने नागरिकातमद्ये भीती चे वातावण निर्माण झाले पोलिस नेमकी काय भूमिका घेणार की हे सत्र असेच सूरु च राहील या कडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.–

# जिल्ह्यामध्ये आरोग्य तपासणी मोहीम

## ४०२ बालकांवर उपचार



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८अमरावती–** जिल्ह्यात एप्रिल ते नोव्हेंबर या आठ महिन्यांच्या कालावधीत शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालयांत राबवलेल्या आरोग्य तपासणीत ६९ बालकांना हृदयविकार आढळून आला आहे. त्यांची तपासणी केली असता, त्यांच्या हृदयाला छिद्र असल्याने वेळीच शस्त्रक्रिया करून या मुलांना जीवनदान दिले आहे. तसेच ज्या मुलांमध्ये जन्मजात विकृती तसेच इतर आजार आढळले, अशा ४०२ बालकांवरही विविध शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती जिल्हा सामान्य रुग्णालय विभागाने दिली आहे.

न १ एप्रिल ते ३० नोव्हेंबर या आठ महिन्यांच्या न कालावधीत शाळेत राबवण्यात आलेल्या आरोग्य तपासणी मोहिमेत ६९ बालकांना हृदयविकार असल्याचे आढळून आल्याने वेळीच त्यांच्यावर मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे, तर ४०२ बालकांवर इतर विविध शस्त्रक्रिया करण्यात आल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत अंगणवाडी, शाळा तसेच कनिष्ठ महाविद्यालय स्तरावर बालकांच्या विविध तपासण्या केल्या जातात. यासाठी तपासणी कॅम्पही शाळा, महाविद्यालय स्तरावर राबवले जातात. यामध्ये काही बालकांमध्ये जन्मानंतर एएसडी, व्हीएसडी आणि पीडीए हे हृदयाशी संबंधित आजार आढळून येतात. या आजारात फुप्फुसांकडे होणाऱ्या अतिरिक्त रक्त प्रवाहामुळे श्वास घ्यायला त्रास होणे, धाप लागणे, थकवा वाटणे, वजन न वाढणे यासारख्या समस्या दिसून येतात. दरम्यान, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत १ ते १८ वर्षे वयोगटातील बालकांच्या विविध गंभीर आजारांवरील शस्त्रक्रिया मोफत केल्या जातात. आठ महिन्यांत ६९ बालकांवर हृदयविकार, तर ४०२ बालकांवर इतर शस्त्रक्रिया झाल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांनी सांगितले.

# वाल्मीक कराड फरार

## CID कडून पत्नीची २ तास चौकशी

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८बीड –** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात सीआयडीने कसून चौकशी करण्यास सुरू केले आहे. या प्रकरणात वाल्मीक कराड यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले असून सध्या ते फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी सीआयडीने आता त्यांची पत्नी मंजिली कराड यांची चौकशी केली आहे. वाल्मीक कराड यांच्यावर अनेक खंडणीचे गुन्हे दाखल असल्याचे बोलले जात आहे.वाल्मीक कराड हे मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय मानले जातात. त्यामुळे संतोष देशमुख हत्या प्रकरणात धनंजय मुंडे यांच्यावर देखील विरोधकांकडून आरोप केले जात आहेत. खंडणीच्या गुन्हा प्रकरणात वाल्मीक कराड फरार आहेत. त्यामुळे सीआयडीने त्यांच्या पत्नीची आज चौकशी केली आहे. दोन ते अडीच तास मंजिली कराड यांची चौकशी केली आहे. त्यानंतर त्यांना सोडून देण्यात आले आहे. वाल्मीक कराड फरार असल्याने त्यांच्या पत्नीची चौकशी करण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.दरम्यान, सीआयडीकडून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांची देखहील चौकशी करण्यात आली आहे. चौकशीनंतर चव्हाण यांनी प्रतिक्रिया देखील दिली आहे. राजेश्वर चव्हाण म्हणाले, मी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचा जिल्हाध्यक्ष आहे आणि या दरम्यान धनंजय मुंडे यांच्या पीआरचे काम वाल्मीक कराड बघायचे. माझा त्यांचा संपर्क होत होता. मी त्यांना ओळखतो का हे विचारण्यासाठी मला पोलिसांनी बोलावून घेतले होते, असे त्यांनी सांगितले आहे.



सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देखील बीडमधील गुन्हेगारीचे प्रकरण उचलून धरले आहे. अंजली दमानिया यांच्याकडून धनंजय मुंडे तसेच वाल्मीक कराड यांच्या समर्थक कसे बंदूक घेऊन दहशत पसरवत आहेत याबद्दल सातत्याने पोस्ट केले जात आहेत. त्यांनी वाल्मीक कराड यांना अटक करण्याची देखील मागणी केली आहे.

# अचलपूर पालिकेची नवीन कर आकारणी ठरतेय त्रासदायक

## आक्षेप, हरकतीची प्रक्रिया ऐनवेळी रद्द केल्याने उडाला गोंधळ

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२८अचलपूर–** नगर पालिका प्रशासनाच्या वतीने चौथ्यांदा नवीन चतुर्थ वार्षिक मालमत्ता कर आकारणी प्रारूप तयार करून यादी प्रसिद्ध केली. त्यानंतर मालमत्ता धारकांना नोटीस देत हरकती आक्षेप नोंदवण्याचे आवाहन केले होते. शुक्रवारी कल्याण मंडपम येथे सुनावणीप्रसंगी नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याने पालिका प्रशासनाने ऐन वेळेवर ही सुनावणी रद्द केल्याने गोंधळ निर्माण झाला.


अचलपूर नगर पालिकेने २०२४–२५ ते २०२७–२८ या चार वर्षांसाठी पालिका क्षेत्रातील इमारती व भूखंडांच्या कर निर्धारणासाठी झोननिहाय वसुली याद्या तयार केल्या. मूल्य निर्धारण अधिकारी अचलपूर नगर परिषद व नगर रचनाकार अमरावती यांनी याद्यांची तपासणी करून नागरिकांना नोटीस बजावत २४ डिसेंबरपर्यंत आक्षेप अर्ज मागक्ले होते. १८, १९ व २० डिसेंबरला हरकती व सुनावणीची प्रक्रिया सुरू केली होती. बहुतांश नागरिकांनी हरकती नोंदवल्या. पालिकेत जवळपास नव्या कर निर्धारणांतर्गत ३६ हजार मालमत्ताधारक आहेत. ६ हजार मालमत्ताधारकांना हरकती संदर्भातील नोटीसप्राप्त झाली नाही. नगरपालिकेने नेमलेल्या पीएमसीच्या कामकाजावर नागरिकांनी आक्षेप घेतला आहे. बहुतांश मालमत्ता धारकांना प्राप्त झालेला मालमत्ता कर चुकीचा आहे. ते सर्वेक्षणही चुकीचे केले, अशा नागरिकांच्या तक्रारी आहेत. शुक्रवारी पालिकेच्या वतीने कल्याण मंडपम येथे सुनावणी सुरू होताच नोटीस दिलेल्या नागरिकांसोबतच अन्य नागरिकांची गर्दी झाली होती. त्यामुळे सभागृहात गोंधळ निर्माण झाला. या ठिकाणी एकच पोलिस कर्मचारी बंदोबस्तासाठी असल्याने नाइलाजास्तव पालिका प्रशासनाला २७ व २८ डिसेंबरची सुनावणी रद्द करावी लागली.

### सुनावणीच्या तारखा कळवणार

अचलपूर नगर पालिकेच्या वतीने मालमत्ता कर निर्धारणासंदर्भातील प्रक्रिया तूर्तास रद्द केली असून, लवकरच पुढील सुनावणी संदर्भातील तारखा मालमत्ता धारकांना रितसर कळवण्यात येतील. २७ व २८ डिसेंबर रोजीची सुनावणी रद्द केली आहे. याची नागरिकांनी दखल घ्यावी. प्रत्येक मालमत्ता धारकांचे म्हणणे प्रशासन विचारात घेईल, असे कर निरीक्षकांनी कळवले आहे.

# त्र्यंबकेश्वर : ५ जानेवारीपर्यंत व्हीआयपी दर्शनसेवा बंद

**दि.२८त्र्यंबकेश्वर –** नाताळच्या आलेल्या सुट्या तसेच नवीन वर्षामुळे दर्शनासाठी देशभरातून हजारोंच्या संख्येने भाविक त्र्यंबकेश्वर येथे ज्योतिर्लिंगच्या दर्शनासाठी येत आहेत. या दरम्यानच्या काळात व्हीआयपी व्यक्तीदेखील दर्शनासाठी येत असतात. यामुळे त्यांची दर्शनाची सोय करण्यासाठी प्रशासनाला मोठी कसरत करावी लागते. याच पार्श्वभूमीवर श्री त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टच्या वतीने ५ जानेवारी २०२५ पर्यंत अति महत्त्वाच्या व्यक्ती वगळता अन्य सर्व प्रकारची व्हीआयपी दर्शनसेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. त्र्यंबकेश्वर देवस्थान ट्रस्टने अतिमहत्त्वाच्या व्यक्तीसाठी केंद्रीय वा राज्यस्तरावरून अथवा जिल्हाधिकारी यांच्यामार्फत प्राप्त होणाऱ्या राजशिष्टाचारा संबंधी लेखी पत्रव्यवहाराव्यतिरिक्त सर्व प्रकारची व्हीआयपी दर्शनसेवा ५ जानेवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.



# सेलूतील सीसीआयची कापूस खरेदी दहा दिवसांपासून बंद

विदर्भ प्रजासत्ताक

**दि. २८ सेलू :** शेतकऱ्यांना खासगी जिनिंगमध्ये कापूस विकणे नुकसानीचे ठरत असल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सेलू उपबाजार पेठ अंतर्गत येणाऱ्या येथील काही जिनिंगमध्ये शासनाने सीसीआयची कापूस खरेदी सुरू केली होती. यामुळे शेतकऱ्यांनाही आनंद झाला होता, मात्र हा आनंद औटघटकेचा ठरला. येथील संकलन केंद्रावर कापूस कमी येत असल्याचे कारण पुढे करून ग्रेडर हर्षल शिंदे यांची यवतमाळ येथे बदली करण्यात आली. त्यामुळे गेल्या दहा दिवसांपासून सीसीआयची खरेदी बंद असल्याने शेतकऱ्यांमध्ये रोष वाढला आहे. यावर्षी निसर्गाच्या दुष्टचक्रामुळे आधीच नापिकी झाली आहे. भरीसभर योग्य भावही मिळत नाही. शेतकऱ्यांच्या सततच्या रेट्यामुळे शासनाने सीसीआयची कापूस खरेदी सुरू केली. मात्र त्याच्यातही खोडा घातला जात आहे. तीन आठवड्यांपूर्वी सुरू झालेल्या येथील कापूस संकलन केंद्रावर कापूस विक्रीसाठी बारा भानगडी केल्या जात आहे. कापूस विक्रीची नोंद करण्यासाठी शेतकऱ्यांना स्वतः कागदपत्रासह हजर राहण्याचा नियमही शेतकऱ्यांना त्रास देऊन गेला. खासगी कापूस संकलन केंद्रापेक्षा कापूस खरेदी केंद्रावर चांगला भाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा कल इकडे होता मात्र, येथील अधिकाऱ्यांच्या भानगडी शेतकऱ्यांना त्रासदायक ठरल्या सेलूच्या कापूस संकलन केंद्रावर कापसाची आवक कमी आहे, असे सांगत भारतीय कपास निगमच्या अकोला येथील महाप्रबंधकाने येथील ग्रेडरची बदली केली.

# प्रत्येक मंदिरासाठी सुरक्षा समिती स्थापन करण्याचा मंदिर विश्वस्तांचा निर्धार !

विदर्भ प्रजासत्ताक

**दि. २८शिर्डी –** श्री साई पालखी निवारा, शिर्डी येथे २४ आणि २५ डिसेंबरला आयोजित करण्यात आलेल्या तृतीय ‘महाराष्ट्र मंदिर न्यास परिषदे’च्या समारोपप्रसंगी प्रत्येक मंदिरांसाठी सुरक्षा समिती स्थापन करण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला. याचबरोबर मंदिरांच्या भूमीचे बेकायदेशीर हस्तांतरण रोखण्यासाठी ‘अँटी लँड ग्रॅबिंग’ कायदा शासनाने तात्काळ लागू करावा यांसह एकूण १० ठराव ‘हर हर महादेव’च्या गजरात एकमताने संमत करण्यात आले. मंदिर महासंघाच्या या मागण्या घेऊन लवकरच मा. मुख्यमंत्र्यांची भेट घेण्याचे ठरवले असून त्यासाठी राज्याचे रोजगारहमी मंत्री श्री. भरतशेठ गोगावले यांनी विशेष सहकार्य करू, असे आश्वासन दिले आहे. या परिषदेसाठी ‘श्री विघ्नहर गणपती देवस्थान ट्रस्ट’चे विश्वस्त, पुण्याचे ग्रामदैवत श्री कसबा गणपति, भीमाशंकर देवस्थान, रांजणगाव आणि जेजुरी देवस्थान, श्रीक्षेत्र बेट कोपरगाव येथील राष्ट्रसंत जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज समाधी मंदिर, अखिल भारतीय पुरोहित महासंघाचे प्रतिनिधी, श्री तुळजाभवानी पुजारी मंडळ, संत पिठांचे प्रतिनिधी यांच्यासह राज्यभरातून ८७५ हून अधिक मंदिर विश्वस्त प्रतिनिधी उपस्थित होते. यापुढील काळात देशासाठी आदर्श असे मंदिरांचे संघटन महाराष्ट्रात उभे करण्याचे निश्चय सर्वांनी केला. एकमताने संमत करण्यात आलेले ठराव ! – मंदिरे, तसेच मंदिरांच्या भूमीवर झालेल्या अतिक्रमणाच्या विरोधात दर आठवड्यातून एकदा ‘मंदिर तेथे सामूहिक आरती’ करणे, काशी आणि मथुरा तीर्थत्रक्षेत्रांचा खटला जदलगती न्यायालयात चालवावा ; सरकारने राज्यातील सर्व मंदिरे



सरकारमुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत; मंदिरात भक्तांनी अर्पण केलेला निधी महाराष्ट्र सरकारने विकासकामां साठी न वापरण्याची घोषणा करावी; धर्मादाय आयुक्त कार्यालये मंदिरांना विविध कारणांसाठी देणगी देण्यासाठी आज्ञापत्रे पाठवत आहेत. अशी नियमबाह्य सरकारी पत्रे महाराष्ट्र शासनाने रोखावीत आणि मंदिरांचा निधी केवळ धार्मिक कार्यासाठी उपयोगात आणला जावा, अशी सूचना धर्मादाय आयुक्त कार्यालयाला करावी; महाराष्ट्रातील पौराणिक, ऐतिहासिक महत्त्व असलेल्य मंदिरांचा तात्काळ जीर्णोद्धार करण्यासाठी सरकारने अर्थसंकल्पात भरीव तरतूद करावी; तीर्थक्षेत्रे, श्रीक्षेत्रे, गडकिल्ले यांवर असलेल्या मंदिरांवर झालेल्या अतिक्रमणाचे महाराष्ट्र सरकारने सर्वेक्षण करून तात्काळ ती अतिक्रमणे दूर करावीत; ‘ब’ वर्गात वर्गीकृत केली जात नाहीत. याची शासनाने दखल घेऊन त्या संदर्भात तातडीने कार्यवाही करावी; मंदिर परिसर मद्य–मांस मुक्त होण्यासाठी सरकारने अधिसूचना काढावी; राज्यातील मंदिरांच्या पुजार्यांना प्रतिमाह मानधन देण्याचा निर्णय घ्यावा !मंदिरांच्या समस्यांवर चर्चा : दोन दिवसांच्या मंदिर परिषदेत मंदिरांच्या विविध समस्यांवर चर्चा, तज्ञ अन् मान्यवरांचे मार्गदर्शन, तसेच गटचर्चा आयोजित करण्यात आल्या. यात ‘मंदिरे सनातन धर्मप्रचाराची केंद्रे बनवणे’, ‘वक्फ कायद्या’द्वारे मंदिरांच्या भूमीवर अतिक्रमण आणि मंदिरे बळकावणे यांवर उपाय’, ‘मंदिरां मधील वस्त्रसंहिता’, ‘धर्मादाय आयुक्त कार्यालय आणि मंदिरांचा समन्वय’ आदी विषय होते.

# पैसे देणारे पीक जवस; तरी शेतकऱ्यांची पाठ का?

## पीक स्पर्धेतून शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यावर भर



### जवसाकडे शेतकऱ्यांची पाठ का?

नगदी पीक म्हणून कापूस, सोयाबीन या पिकांकडे शेतकऱ्यांचा कल आहे. पूर्वी पीक घेत असले तरी त्यातून फारसे उत्पन्न होत नाही.

**– समीर जवंजाळ**

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

जवस पीक हे रब्बी हंगामातील महत्त्वाचे तेलबिया पीक म्हणून ओळखले जाते. जवसाचा उपयोग तेल काढणे आणि धागा निर्मितीसाठी देखील केला जातो. जवस हे पौष्टिक असून, यातून आठ प्रकारची प्रथिने, कर्बोदके, जीवनसत्वे व खनिजे मिळतात. मात्र, मागील काही वर्षांमध्ये जिल्ह्यात जवस पीक घेण्याकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. आता पीक स्पर्धेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जात आहे.

जवसाच्या तेलामध्ये ५८ टक्के ओमेगा तीन, ओमेगा सहा, कोलेस्ट्रॉल आणि अँटीऑक्सिडंट असतात. जवसाला बाजारात चांगली मागणी असते. असे असतानाही अमरावती जिल्ह्यात हंगामात पाहिजे तशी जवस पिकाची लागवड झालेली नाही. हे केवळ जवस पिकाच्या बाबतीत नाही तर रब्बी हंगामातील अनेक तेलबियांची – लागवड आता जिल्ह्यात कमी झाली आहे. या पिकांचे घटलेले क्षेत्र वाढविण्यासाठी कृषी विभागाकडून पीक स्पर्धा घेऊन शेतकऱ्यांना तेलबिया पीक लागवडीकडे वळविण्याचा प्रयत्न सुरू आहे. मात्र आजही जवळ पिक घेण्यासाठी शेतकरी उत्साही नाही हे विशेष.

पीक स्पर्धेतून शेतकऱ्यांना प्रोत्साहन रब्बी हंगामातील जवस आणि इतरही तेलबियांचा पेरा घटला आहे. यामध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने कृषी विभागाकडून पीक स्पर्धेचे आयोजन करून घटलेले उत्पन्न पुन्हा वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. असे असले तरी जिल्ह्यात जवस पीक घेण्याकडे शेतकऱ्यांचा कल नाही.

जिल्ह्यात पेरा कमी मागील काही वर्षात जिल्ह्यातील पेरा कमी झाला आहे. यंदाच्या रब्बी हंगामात काही ठिकाणीच जवसाची लागवड करण्यात आली आहे. पूर्वी जिल्ह्यातील बहुतांश भागात जवस पीक घेतले जात होते. मात्र आजघडीला शेतकऱ्यांनी याकडे पाठ फिरवल्याचे दिसते.

# गडकरींच्या नाराजीनंतर जिल्हाधिकाऱ्यांकडे विमानतळाची जबाबदारी




**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८६नागपूर :**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूर विमानतळावरील धावपट्टीच्या 'रिकार्पेटिंग'ला विलंब होत असल्याने संताप व्यक्त केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे अध्यक्ष असलेल्या मुख्यमंत्र्यांनी नागपूर विमानतळाची जबाबदारी एमएडीसीच्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांच्याकडून काढून घेतली आहे. नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांच्याकडे नागपूर विमानतळाची जबाबदारी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

एमएडीसीच्या व्यवस्थापकीय संचालक म्हणून स्वाती पांडे कार्यरत आहेत. एमएडीसी आणि भारतीय विमानतळ प्राधिकरण यांच्या संयुक्त उपक्रम मिहान इंडिया लि. (एमआयएल) ही कंपनी नागपूर विमानतळाचे व्यवस्थापन पाहते. सध्या एमआयएलचे अध्यक्ष स्वाती पांडे आहेत. परंतु विमानतळावरील धावपट्टीचे 'रिकार्पेटिंग' अनेक दिवसांपासून रखडले आहे. त्यामुळे येथील उड्डाणाच्या वेळांवर मर्यादा आल्या आहेत. परिणामी काही विशिष्ट वेळातील विमानांचे तिकीट महागले आहे. त्यावरून नितीन गडकरी यांनी एमआयएल आणि एएआय अधिकाऱ्यांना तसेच हे काम करीत असलेल्या कंत्राटदारवर नाराजी व्यक्त केली. गेल्या सोमवारी गडकरी यांनी नागपूर विमानतळाला भेट दिली आणि संथ गतीने होत असलेल्या कामाबाबत संताप व्यक्त केल्या. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वाती पांडे कडून एमआयएलचे अध्यक्षपद काढून जिल्हाधिकारी डॉ. इटनकरकडे दिले आहे. शिवाय या कामावर देखरेख ठेवण्यासाठी एक समिती देखील स्थापन करण्यात आली आहे. या समितीमध्ये केंद्रीय मंत्री निती गडकरी, मुख्यमंत्री फडणवीस, महापालिका आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी, पोलीस आयुक्त रवींद्र सिंगल आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या धावपट्टीचे 'रिकार्पेटिंग' अनेक दिवसांपासून रखडले आहे. परिणामी, विमान वाहतूक प्रभावित झाली आहे. प्रवाशांना याचा प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. २०२४ मे महिन्यात के जी गुप्ता कंपनीला रनवे रिकार्पेटिंगचं काम दिलं. रनवे रिकार्पेटिंगच्या कामामुळे विमान कंपन्यांनी शेड्युल बदलले, त्यामुळे विमान तिकिटांचेच दर वाढले .

त्यामुळे लवकरात लवकर धावपट्टीचे काम पूर्ण करण्याचे निर्देश गडकरी यांनी पाहणीनंतर अधिकाऱ्यांना दिले होते. तसेच मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासोबत याबाबत चर्चा केली होती.केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली विमानतळाच्या कामावर लक्ष ठेवण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीत दिलीप जाधव, चंदन गोस्वामी, प्रकाश भोयर, गिरीधारी मंत्री, संजय पेशने आणि उदय आंबुलकर यांचा समावेश आहे. ही समिति लवकरच आढावा बैठक आयोजित करणार आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी इटनकर यांच्याकडे एमआयएलचे अध्यक्ष म्हणून नागपूर विमानतळाची जबाबदारी आली आहे. ते आता विमानतळाच्या दैनंदिन व्यवहार विशेषत: धावपट्टीचे 'रिकार्पेटिंग'च्या कामावर लक्ष ठेवणार आहेत.



# राज्यात वनक्षेत्रातील आगीचा भडका;दोन वर्षांत ५४ हजार हेक्टर क्षेत्र खाक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

राज्यातील वनक्षेत्राला दोन वर्षांत मोठ्या प्रमाणात आगी लागल्यामुळे वन्यजीव, वनांची मोठी हानी झाली आहे. सर्व्हे ऑफ इंडियाच्या अहवालानुसार, राज्यात १६ टक्के वनक्षेत्राची नोंद आहे. दरवर्षी उन्हाळ्यात वनक्षेत्रातील आगी लागतात. त्याची कागदोपत्री नोंद झाल्यावर पुढे कृती होताना दिसून येत नाही. २०२२ ते २०२४ या कालावधीत जलद आगीमुळे २ टक्के वनक्षेत्र जळाले. गंभीर आगीमध्ये १२.५७ टक्के वनक्षेत्र राख झाले. एकूण ५४ हजार हेक्टर वनक्षेत्र या दोन वर्षांत जळाल्याची नोंद आहे.

राज्यात जंगलांना आगी लागू नये, यासाठी ठोस उपाययोजना केल्या जातील. सचिव स्तरावर आढावा घेऊन आगीसंदर्भात गत दोन वर्षांत वन विभागाने केलेली कृती तपासली जाईल. तसेच आगीवर नियंत्रणासाठी अद्ययावत यंत्रसामग्रीचा वापर केला जाईल अशी माहिती गणेश नाईक, वनमंत्री यांनी दिली.

# नववर्षात एक अंगारकी संकष्टी, तीन गुरुपुष्यामृत योग, चार ग्रहण


## ज्योतिष्यशास्त्रातील घडामोडी : २९ मार्चपासून शनीची व २९ मे रोजी राहू-केतूची दशा बदलणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

नवीन वर्षाचे काउंटडाऊन सुरू झाले आहे. अनेकांनी नवीन वर्षात स्वत:शी काही संकल्प बांधले आहेत. ज्योतिष शास्त्राच्या मते नवीन वर्ष कसे राहील, याबाबत सांगताना ज्योतिष्याचार्य डॉ. अनिल वैद्य म्हणाले की, २०२५ मध्ये एक अंगारकी संकष्टी चतुर्थी, तीन गुरुपृष्यामृत योग आणि चार ग्रहण आहेत.ग्रह स्थितीबद्दल ते म्हणाले की, रवी-चंद्र हे धनू राशीत असून, मंगळ कर्क राशीत आहे. ग्रहतालिकेत मंत्रिपद असलेला शनी हा कुंभ राशीत असून, गुरु वृषभ राशीतून भ्रमण करणार आहे. शनी २९ मार्च रोजी मीन राशीत प्रवेश करणार असून, त्यामुळे मकर राशीची साडेसाती संपुष्टात येणार आहे. तर मेष राशीला शनीची दिशा सुरू होणार आहे. त्यामुळे २९ मार्चनंतर कुंभ, मीन आणि मेष राशींना शनीची साडेसाती राहील. २९ मे रोजी राहू आणि केतू प्रत्येकी कुंभ आणि सिंह राशीत प्रवेश करतील..







विवाह आणि व्रतबंधाचे मुहूर्तया वर्षात विवाहासाठी फक्त ५६ मुहूर्त अशून, व्रतबंधाचे फक्त २२ मुहूर्त आहे. जुलै ते डिसेंबरमध्ये मुहूर्त नाही. नव्या वर्षाचे वैशिष्ट्यनव्या वर्षाचे वैशिष्ट्य म्हणजे १२ पैकी ४ महिन्यांमध्ये प्रत्येकी पाच शनिवार आणि पाच रविवार आलेले आहे. हा दुर्मिळ योग समजला जातो.

### काही महत्त्वाच्या नोंदी

फक्त एकच अंगारकी संकष्टी चतुर्थी असून ती १२ ऑगस्ट रोजी आहे.

पितृपक्ष पंधरवडा फक्त चौदा दिवसांचा असून, ८ सप्टेंबर ते २१ सप्टेंबर असा आहे.

तीन गुरुपुष्यामृत योग आहेत. २४ जुलै. २२ ऑगस्ट आणि १८ सप्टेंबर.

गणेश उत्सव दहा दिवसाचा असून, नवरात्र अकरा दिवसाचे व दीपावलीपर्व सात दिवसाचे असणार आहे.

२०२५ या वर्षात दोन खग्रास चंद्रग्रहण असून दोन खंडग्रास सूर्यग्रहण आहेत.

यातील ७, ८ सप्टेंबर रोजी होणारे खग्रास चंद्रग्रहण भारतातून दिसेल.

यंदाची संक्रांत 'महोदरी'यावर्षी मकरसंक्रांतीचे वार नाव आणि नक्षत्र नाव महोदरी आहे. जातीने सर्प असून वयाने कुमारी आहे. मकर संक्रांतीपासूनच श्रीक्षेत्र प्रयागराज येथे कुंभमेळा प्रारंभ होत आहे. ज्या काळात देवगुरु बृहस्पती वृषभ राशीत असतात आणि सूर्यनारायण मकर राशीत असतात, त्या काळात प्रयाग येथे कुंभमेळा भरतो. १४ जानेवारीपासून असा योग येत आहे.

# बँकेचे अध्यक्ष पार्टीत रमले; एका चालकाने साडेतीन लाख उडविले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८यवतमाळ :**

येथील शेतकऱ्यांची बँक म्हणून प्रसिद्ध असलेल्या एका बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि मर्जीतील काही अधिकारी नेहमीच्या पार्टीत दंग असताना बँकेच्या अध्यक्षांच्या वाहनातून चक्क साडेतीन लाख रूपयांची रोकड उडविण्यात आली. या घटनेने बँकेच्या वर्तुळात एकच खळबळ उडाली. प्रतिष्ठा जपण्यासाठी पोलिसांत लेखी तक्रार देण्यात आली नाही. मात्र पोलिसांची मदत घेवून चोराला शोधण्यात यश आले. बँकेच्या उपाध्याक्षांच्या वाहनावरील माजी चालकाने ही रक्कम लंपास केल्याचे उघड झाले.




शेतकऱ्यांची ही बँक गेल्या काही वर्षांपासून वेगवेगळ्या कारणांनी चर्चेत आहे. कधी नोकर भरती तर कधी शाखांमधील अफरातफर यामुळे बँक कायम चर्चेत असते. आता पार्टीतून अध्यक्षांच्याच वाहनातील रोकड लंपास झाल्याने बँक चर्चेत आली. यवतमाळ शहरानजीक लोहारा परिसरात बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व काही अधिकारी नेहमीप्रमाणे पार्टीसाठी गेले. बँकेचे संचालक, अधिकाऱ्यांच्या पाटर्या नित्यानोच्या झाल्या आहेत. लोहारा परिसरात रंगलेल्या या पार्टीत 'खेळ' रंगला. या खेळात होणारी उलाढाल चर्चेचा विषय असते. पार्टीत खेळ चालत असल्याने येथे येणाऱ्या संचालकांच्या वाहनात नेहमीच रोकड असते. याची माहिती वाहन चालकांनाही असते. हीच बाब हेरून त्या दिवशी अध्यक्ष, उपाध्यक्ष व अधिकारी पार्टीत रमल्याचे बघून एका चालकाने अध्यक्षांच्या वाहनातील रक्कम लंपास केली. उपाध्यक्षांच्या वाहनावरील माजी चालकाने अध्यक्षांच्या वाहनाचे काच फोडून रक्कम लंपास केली. अध्यक्ष पार्टीहून परत आल्यानंतर त्यांना वाहनाची काच फुटलेली दिसली. वाहनात ठेवलेली रोकडही लंपास झाल्याचे आढळले. त्यामुळे एकच खळबळ उडाली.

पार्टीत उपस्थित असलेल्या सर्वांना विचारपूस करूनही काहीच सुगावा लागला नाही. त्यामुळे प्रकरण पोलिसांकडे पोहचले. पोलिसांनी घटनास्थळी जावून पाहणी केली. तसेच तेथील सीसीटिव्हीची तपासणी केली. तेव्हा उपाध्यक्षाच्या माजी चालकाने रोकड उडविल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्या चालकाला ताब्यात घेवून पोलिसी हिसका दाखवताच त्याने चोरीची कबुली दिली व रोकड परत आणून दिली. चोरी गेलेली रक्कम परत मिळाल्याने अध्यक्षांसह उपाध्यक्ष व पार्टीत उपस्थित अधिकाऱ्यांनी सुटकेचा श्वास सोडला. बँकेची प्रतिष्ठा धुळीस मिळू नये, हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली नाही. पोलिसांनीही सर्व प्रकार 'ऑफ दि रेकॉर्ड' ठेवण्याचे अभिवचन दिले. मात्र आता बँकेसह पोलीस वर्तुळात या पार्टीतील चोरीची खमंग चर्चा सुरू आहे. सोबतच अध्यक्षांच्या ज्या वाहनाची काच फोडून ही चोरी करण्यात आली होती, ती काचही तातडीने बसवून घेण्यात आली. त्यासाठी १५ हजार रूपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात आल्याची चर्चा आता बँकेत सुरू आहे.

# विठ्ठल नित्यपूजेच्या 'ऑनलाईन' नोंदणीस उत्स्फूर्त प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८पंढरपूर**

सावळ्या विठूरायाची नित्यपूजेसाठी संकेतस्थळावरून नोंदणी कालपासून सुरू होताच पहिल्याच दिवशी ३१ मार्च २०२५ पर्यंतची नोंदणी पूर्ण झाली आहे. या 'ऑनलाईन' नोंदणीला राज्यासह कर्नाटक, तामिळनाडू आणि आंध्र प्रदेश येथून भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याची माहिती श्री विठ्ठल



रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली आहे. येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या सर्व पूजा श्री. विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीकडून भाविकांना उपलब्ध करून देण्यात येतात. या पूजेसाठी अगोदर नोंदणी करण्याची पद्धत सुरू केली आहे. वेळ आणि श्रम यामध्ये बचत होते. ही नोंद करण्यासाठी मंदिर समितीकडून https://www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावरून २६ डिसेंबरपासून 'ऑनलाईन' नोंदणी होताच केवळ एकाच दिवसात ३१ मार्च २०२५ पर्यंतची नोंदणी पूर्ण झाली आहे. या योजनेला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. श्रींच्या नित्यपूजा, तुळशी पूजा व पाद्यपूजा ऑनलाईन नोंदणीची सर्व प्रक्रिया पारदर्शकपणे पार पडत असल्याचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी सांगितले.

# ग्राहक सेवेच्या गुणवत्तेत सुधारणा करून त्यामध्ये सातत्य राखा : महावितरणचे संचालक अरविंद भादीकर

## वितरण हानी कमी करुन १००% वीजबिल वसूली करण्याचे निर्देश : अमरावती परिमंडळाचा घेतला आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

केंद्र शासनाच्या 'इझ ऑफ लिव्हिंग' (राहणीमान सुलभता) अभियानानुसार वीज ग्राहकांना राज्य वीज नियामक आयोगाने निश्चित केलेल्या मानकानुसार उत्तम सेवा देणे आणि त्या सेवेत सातत्य राखणे ही महावितरणची जबाबदारी आहे, हे लक्षात घेऊन काम करा. वितरण हानी कमी करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करणे, ग्राहक सेवेमध्ये गुणात्मक सुधारणा करणे, ग्राहकाभिमूख विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करतांना परिमंडळात १००% वीजबिल वसुली करण्याचे निर्देश महावितरणचे संचालक (संचालन)श्री अरविंद भादीकर यांनी दिले.

विद्युत भवन येथे (दि.२७) झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते.यावेळी मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी,अधीक्षक अभियंते दीपक देवहाते (अमरावती) , प्रवीण दरोली (यवतमाळ), दिपाली माडेलवार (पायाभूत आराखडा) यांच्यासह परिमंडळ कार्यालयाचे सर्व विभागप्रमुख,सर्व कार्यकारी अभियंते,व्यवस्थापक वित्त व लेखा,अमरावती शहर विभागातील उपविभागीय अधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हानिहाय आढावा घेतांना मा. संचालक (संचालन)श्री भादीकर म्हणाले की,वितरण हानी कमी करण्यासाठी महावितरणने ठरवून दिलेल्या कृती आराखड्यानुसार काम होणे आवश्यक आहे. त्यामध्ये प्रामुख्याने ग्राहकांना



वापरानुसार अचूक वीजबिल देणे, ग्राहकांचे नादुरुस्त मीटर बदलणे, वीज चोरीला आळा घालण्यासाठी नियमित ग्राहक -मिटर तपासणी मोहिम राबविणे , वीज चोरी असलेल्या क्षेत्रात इन्सुलेटेड वीज वाहिनीचा वापर करणे, ग्राहकांना तत्काळ वीज जोडणी देणे, ग्राहकांच्या खंडित वीजपुरवठा, देयक दुरुस्ती इत्यादी तक्रारींचे त्वरित निवारण करणे, आदीचा समावेश आहे.

तथापि, विज गळती कमी करण्याच्या दृष्टीने यावर्षी अमरावती जिल्ह्यात ११ हजार २४३ आणि यवतमाळ जिल्ह्यात ६ हजार ७६० नादुरुस्त मिटर बदलण्याचे काम सोडले तर वीज चोरीला आळा घालण्यासाठी नियमित तपासणी मोहीम राबवणे, वीज चोरी पकडणे, ऋखठ दाखल करणे, अत्यल्प तसेच सरासरी वीज बिल असलेल्या ग्राहकांची तपासणी करणे, याबाबत विशेष प्रयत्न झाले नसल्याने मा. संचालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित ग्राहकांसाठी महावितरण कंपनीने अभय योजना जाहीर केलेली असून त्यामध्ये संपूर्ण व्याज व विलंब आकाराची माफी असतांनाही ग्राहकांच्या प्रतिसाद समाधानकारक नसल्याने सर्व थकबाकीदार पीडी ग्राहकांची प्राधान्याने तपासणी करणे,अनाधिकृत वीज पुरवठा आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करणे, जर अन्य ग्राहकाच्या नावाने त्या जागेवर नविन कनेक्शन दिलेले आढळल्यास जुनी थकबाकी त्या नवीन ग्राहकांकडे वळती करणे , तसेच विभागवार पथके तयार करून वीज चोरी पकडणे, पी डी ग्राहकाच्या ठिकाणी विजेचा वापर होत नसल्यास अथवा संबंधित इमारत ढासळली असल्यास सदर जागेवर महावितरणची थकबाकी असेल तर त्या जागेवर महावितरणची थकबाकी भरणे जुन्या किंवा नवीन ग्राहकावर बंधनकारक असल्याचे स्पष्ट सूचनाफलक लावण्याचे निर्देश त्यांनी दिले.

# रेशनकार्डच्या ई-केवायसी प्रक्रियेस मुदतवाढ

## शिधापत्रिकाधारकांना दिलासा; राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

स्वस्त धान्य दुकानात वितरणात होणारी गळती रोखण्यासाठी शासनाने राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी बंधनकारक केली आहे. शिधापत्रिकेत नावे असलेल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला ई- केवायसी पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. याची अंतिम तारीख यापूर्वी ३१ डिसेंबर होती, परंतु आता शासनाकडून प्रक्रियेस मुदवाढ देण्यात आली आहे.



राज्यातील सर्व ग्राहकांचे रेशनकार्डला आधार क्रमांक जोडण्यात आले आहेत, तरीदेखील वितरणात २ ते ४ टक्क्यांची गळती असल्याचे दिसून आले आहे. हे प्रमाण १०० टक्के करण्यासाठी राज्यातील सर्व शिधापत्रिकाधारकांना ई-केवायसी बंधनकारक केले आहे. कार्डवरील कुटुंबातील सर्व सदस्यांनी अद्ययावत असलेले आधारकार्ड घेऊन दुकानदाराकडे गेल्यानंतर नवीन फोरजी ई-पॉस मशीनमध्ये आधार क्रमांक टाकून बोटांचे ठसे स्कॅन करून ई-केवायसी करणे बंधनकारक केले आहे. याची अंतिम तारीख यापूर्वी ३१ ऑक्टोबर होती, मात्र गेल्या काही महिन्यांपासून सर्व्हर डाऊनमुळे ई-केवायसी व्यवस्था कोलमडली होती.

त्यामुळे अनेक लाभार्थ्यांचे ई-केवायसी करता आले नव्हते. त्यामुळे ३१ डिसेंबरपर्यंत प्रक्रियेस मुदवाढ देण्यात आली होती. मात्र त्यानंतरही सर्व्हर डाउन आणि मशीनमधील तांत्रिक अडचणीमुळे केवायसी करण्यास अडचणी येत होत्या. अनेक शिधापत्रिकाधारकांचे अजूनही ऑनलाइन केवायसी झालेले नाही. त्यामुळे शासनाने आता पुन्हा एकदा या प्रक्रियेस मुदतवाढ दिली आहे. नागरिकांनी लवकरात लवकर ई-केवायसी करून घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# लाखोंचा महसूल देणाऱ्या दुय्यम निबंधक कार्यालयाजवळ स्वत:चे ऑफिसचं नाही

## चार महिन्यांपासून कार्यालयासाठी भटकंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चिखलदरा**

शासनाला लाखो रुपयांचा महसूल देणाऱ्या दुय्यम निबंधक कार्यालयावर स्वत:चे कार्यालय शोधण्याची वेळ विदर्भाचे नंदनवन असलेल्या चिखलदरा पर्यटनस्थळी आली आहे. मागील चार महिन्यांपासून कार्यालयाची भटकंती सुरू आहे. खरेदी-विक्री करण्यासाठी आवश्यक असलेले हे कार्यालय धारणी येथे आहे. त्यामुळे चिखलदरा तालुक्यातील नागरिकांना उलट प्रवास करावा लागत असल्याचे वास्तव आहे.

धारणी व चिखलदरा या दोन तालुक्यांसाठी दुय्यम निबंधक श्रेणी-१ कार्यालय धारणी येथे आहे. दोन्ही तालुक्यांचा कारभार काही वर्षांपासून तेथे सुरू आहे. पूर्वी तो अचलपूर येथून चालायचा. धारणीचा उलटा प्रवास चिखलदरा तालुकावासीयांना करावा लागतो. परिणामी महिन्यातून दुसरा व चौथा मंगळवार आता चिखलदरा येथे हे कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे. मागील चार महिन्यांपासून अधिकारी चिखलदरा येतात. परंतु, त्यांना कार्यालय थाटण्यासाठी जागा न मिळाल्याने या सर्वाधिक महसूल देणाऱ्या शासकीय कार्यालयाची भटकंती सुरू आहे. दोन वर्षांपासून चिखलदरा तहसील कार्यालयाचे प्रशस्त इमारतीचे बांधकाम सुरू आहे. ते नुकतेच झाले असल्याने त्या इमारतीमध्ये हे कार्यालय थाटले गेल्यास नागरिकांना सोयीचे ठरणार आहे.

या इमारतीमध्ये कार्यालयासाठी जागा मिळावी, यासाठी नुकतीच धारणीचे दुय्यम निबंधक आर.आर. बनसोड यांनी चिखलदऱ्याचे तहसीलदार जीवन मोरणकर यांची भेट घेतली. त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद देत एक कक्ष उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याचे संबंधित अधिकाऱ्यांना सांगितले. त्यामुळे चार महिन्यांपासून भटकंतीवर असलेल्या या कार्यालयाची वाताहत थांबून नागरिकांना न्याय मिळणार आहे.

चिखलदरा येथे दुसरा व चौथा मंगळवार दुय्यम निबंधक कार्यालय राहणार आहे. कार्यालयासाठी जागा तहसीलच्या नवीन प्रशस्ती इमारतीत मिळणार आहे. त्यामुळे जागेचा तिढा जवळपास सुटला आहे. लवकर कार्यालय कार्यान्वित होईल व नागरिकांना सोयीचे होईल.
**– आर.आर. बनसोड**
**दुय्यम निबंधक श्रेणी-१, धारणी.**

**अचलपूर सोयीचे, धारणीसाठी पायपीट**

चिखलदरा तालुक्याचा संपूर्ण कारभार परतवाडा शहरातूनच चालतो. त्यामुळे काटकुंभ, चुरणी, टेंब्रुसोंडा या पट्ट्यातील नागरिकांना अचलपूर येथे दुय्यम निबंध कार्यालय सोयीचे होते. ते धारणीत गेल्याने उलट प्रवास त्यांना करावा लागतो. आता महिन्यातून दुसरा व चौथा मंगळवार चिखलदरा येथे कार्यालय नियमित कामकाज सुरू झाल्यास आर्थिक भुर्दंड, प्रवासाची ससेहोलपट थांबणार आहे.

# दापोरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या स्मृती महोत्सवास सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मोर्शी**

मोर्शी तालुक्यातील दापोरी येथे मानवतेचे महान पुजारी वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचा ५६ वा स्मृती महोत्सव व सर्व संत यांच्या स्मृती दिनानिमित्य संगीतमय ग्रामगीता प्रवचन ह भ प ग्रामगीताचार्य रायजीप्रभु शेलोटकर महाराज यांच्या मधुर वाणीतून मोठ्या उत्साहात संपन्न होत आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबांनी आजन्म सेवा करीत भारताच्या विश्वमानवाच्या सुख समृद्धी उद्धारासाठी अविरत परिश्रम घेतले, शुद्ध त्यागमय बंधुत्वाचा अमृतमूल्य बोध दिला, एकात्मता, विश्व बंधुत्व, विश्वशांती, अंधश्रद्धा, सामुदायिक प्रार्थना, रामधून, हि महान साधना बनवून



ग्रामवासीयांना जागृत केले हे सर्वश्रुतच आहे आज काळाचे गरजेनुसार वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या आचार विचारांची आचरणाची अत्यंत गरज आहे, त्यामुळे या महोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या महोत्सवामध्ये सामुदायिक द्यान, प्रबोधन, स्वच्छता अभियान, रांगोळी स्पर्धा, संस्कारित महिला काळाची गरज या विषयावर व्याख्यान, सत्संग, भजन, व्यसनमुक्ती, विविध वक्त्यांचे व्याख्यान व ३१ तारखेला दापोरी नगरीतून वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेची भव्य शोभायात्रा निघणार असून काल्याचे कीर्तन ग्रामगीताचार्य श्री रायजीप्रभु शेलोटकर यांच्या हस्ते होणार असून या महोत्सवामध्ये यासारखे विविध उपक्रम राबविले जाणार असून राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्मृती महोत्सवामध्ये सहभागी होण्याचे आवाहन गुरुदेव सेवा मंडळातर्फे करण्यात आले .

# जेसीआय अमरावती लेडी जेसी विंग आयोजित कार्निव्हल फन फेअरची यशस्वी सांगता



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २८ अमरावती**

नुकत्याच नियुक्त जेसी विशिता निखिल समदरिया (जैन) यांनी जेसीआय अमरावती लेडी जेसी विंगच्या अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारताच त्यांनी भव्य आनंद मेळा आयोजित करण्याची योजना आखली. जेसीआय अमरावती महिला गटाने आयोजित केलेल्या कार्निव्हल फन फेअरचा २२ डिसेंबर रोजी आयएमए हॉल येथे शानदार समारोप झाला. दुपारी ४ ते १० या वेळेत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शहरवासीयांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन विविध उपक्रमांचा आनंद लुटला. हजाराहून अधिक लोक येथे आले होते. झोन १३ चे अध्यक्ष जेसी डॉ. कुशल झंवर, सीमा बेहरे आणि रश्मी लड्ढा यांच्या हस्ते रिबन कापून कार्निव्हलचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले.

कार्निव्हल फन फेअरमध्ये मनोरंजनासोबतच स्वादिष्ट खाण्यापिण्याचे स्टॉल्स, सर्जनशील प्रदर्शने आणि लहान मुलांसाठी आणि प्रौढांसाठी अनेक रोमांचक क्रियाकलापांचा समावेश होता. या कार्यक्रमाने केवळ कुटुंबांना एकत्र वेळ घालवण्याची संधी दिली नाही तर सहभागींना त्यांची कला आणि व्यवसाय प्रदर्शित करण्यासाठी एक व्यासपीठ देखील दिले.

कार्यक्रमाच्या आयोजक, लेडी जेसी विंग यांनी हे एक मोठे यश असल्याचे वर्णन केले आणि सर्व सहभागी आणि सदस्यांचे आभार मानले. महिला गटाच्या अध्यक्षा सौ विशिता म्हणाल्या, आमचा उद्देश समुदायाला एकत्र आणणे आणि त्यांच्यासाठी एक संस्मरणीय संध्याकाळ प्रदान करणे हा होता. या कार्यक्रमामुळे आम्हाला भविष्यात आणखी मोठे कार्यक्रम आयोजित करण्याची प्रेरणा मिळाली आहे. कार्यक्रमाचे प्रायोजक वरुण इन्व्हेस्टमेंट्सचे अमित चांडक यांनीही कार्यक्रमाच्या यशासाठी टीमचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाच्या यशामुळे जेसीआय अमरावतीची प्रतिष्ठा आणखी मजबूत झाली आहे. स्थानिकांनी या उपक्रमाचे भरभरून कौतुक केले आणि भविष्यात असे आणखी कार्यक्रम आयोजित केले जातील अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष जे.सी.विशिता समदरिया, सचिव नेहा नाहाटा, अध्यक्ष दीपक लोखंडे, समन्वयक संतोष बेहेरे, अभिषेक नाहाटा, महेश चांडक, गोपाल बजाज, गोपाल लड्डा, निखिल समदरिया यांनी परिश्रम घेतले. माजी अध्यक्षा जिसरेत जिग्नेश देसाई, रश्मी लड्ढा, सीमा बेहरे, सुमन गुप्ता, शैलजा चांडक, प्रकल्प संचालक – पूजा लोखंडे, मीनल देसाई, वाणी गांधी, मोनिका पटेल, स्नेहा पटेल, स्वाती कडू, चंचल चांडक, सीमा मुंद्धा, सोनल चांडक, शीतल बावणे. या सर्वांच्या सहकार्याने हा कार्निव्हल अतिशय यशस्वी झाला. माजी अध्यक्ष विजय काकाणी, महेंद्र चांडक, नयन काकाणी, गौरव लुणावत, जयेश पनपलिया, निवृत्त अध्यक्ष सतीश कडू, माजी महिला गटाध्यक्षा वर्षा काकाणी, मुस्कान जयसिंघानी, जयश्री शहाकर, दिवंगत महिला गटाचे अध्यक्ष आर्यन बेहेरे आदी उपस्थित होते.

# कुष्ठरुग्णांना स्वावलंबी जीवन जगता यावे म्हणून दाजीसाहेबांनी तपोवन उभारले : आ.सौ. सुलभाताई खोडके

## डॉ. शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धन यांच्या १३३ व्या जयंती निमित्य अभिवादन कार्यक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

कुष्ठरुग्णांना स्वाभिमानी व स्वावलंबी जीवन जगण्यासाठी जिद्द निर्माण करण्यासाठी दाजीसाहेबांनी तपोवन संस्था उभी केली. कृष्ठरुग्णांसाठी हे एक आपुलकीचे घर आहे. आज कुष्ठरोगबाधित रुग्ण या तपोवनात आपले आयुष्य मोठ्या आनंदाने जगत आहेत. त्यांनी शेती, बाग फुलविली असून ,त्यांचे कौशल्य विकसित झाल्याने अनेक कलाकुसरीच्या वस्तू सुद्धा कुष्ठरुग्णांनी साकारल्या आहेत.



कुष्ठरोग निर्मूलन चळवळीला अधिक व्यापक बनविण्यासाठी सकारात्मक अशा दृष्टीकोनातून आता विविध सामाजिक संघटनांचा पुढाकार सुद्धा महत्वाचा असून या संदर्भात शासनस्तरावर काही अडचणी निर्माण झाल्यास आपण त्या सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मनोगत अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी व्यक्त केले.

थोर स्वातंत्र्य संग्राम सेनानी,समाजसुधारक व कुष्ठरोग निवारणासाठी उभ्या केलेल्या चळवळीचे प्रणेते कै.पद्मश्री डॉ. शिवाजीराव उर्फ दाजीसाहेब पटवर्धन यांच्या आज १३३ व्या जयंती निमित्य पदमश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन कुष्ठसेवा बहुउद्देशीय संस्था विद्यापीठ चौक येथे अभिवादन कार्यक्रम पार पडला. त्यावेळी त्या बोलत होत्या, याप्रसंगी जेष्ठ समाज सेवक डॉ. गोविंदजी कासट, विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई, माजी नगरसेवक- प्रदीप बाजड, सामाजिक कार्यकर्ता- मोहन क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी आमदार महोदयांच्या हस्ते पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून अभिवादन करण्यात आले. पुढे बोलतांना आ.सौ. सुलभाताई खोडके म्हणाल्या की, कुष्ठरुग्णांना सामाजिक जीवन जगता यावे , याकरिता समाजाने त्यांना सन्मानाने जगविणे गरजेचे आहे. त्यांचा समाजात छळ व तिरस्कार होऊ नये म्हणून त्यांना संरक्षण मिळणे, त्यांना वैद्यकीय सुविधा, कौशल्य प्रशिक्षण तसेच मुक्त शिक्षण मिळणे आवश्यक आहे. यासाठी आपण शासनाकडे पाठपुरावा करणार आहोत.

यावेळी आपल्या संबोधनामध्ये प्राचार्य डॉ.सुभाष गवई यांनी दाजीसाहेबांच्या सेवाकार्याला उजाळा दिला. कुष्ठ बांधवांच्या हितासाठी दाजीसाहेबांनी आयुष्य समर्पित केले असल्याचे प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी सांगितले. यावेळी कुष्ठरोग निवारणार्थ काम करणाऱ्या संस्थांचे समन्वयक, सामाजिक कार्यकर्ते तसेच स्थानिक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'लेकराचं कुंकू पुसलं, मुलांकडे पाहावत नाही, हात जोडून सांगतो; बीडच्या आक्रोश मोर्चात जरांगे पाटील भावुक

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २८ बीड**

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला आज १९ दिवस झाले आहेत, मात्र अजूनही या प्रकरणातील काही आरोपींना अजूनही अटक झालेली नाहीये. यावरून आता वातावरण चांगलंच तापलं आहे. आज बीडमध्ये देशमुख यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी सर्वपक्षीय नेत्यांकडून आक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात बोलताना मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी थेट मुख्यमंत्र्यांना इशारा दिला आहे. आरोपींना लवकरात लवकर अटक करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. लेकराला आता बाप दिसणार नाही. तिच्या पाठीवर हात फिरवणारा सोन्यासारखा बाप गेला. तुमचे आमचे भाषण होत राहातील. या कुटुंबाच्या पाठी राहावं लागेल. प्रत्येक जिल्ह्यात तयारी करा. आपला जिल्हा सोडायचा नाही. मागे हटू नका. ते आणखी हल्ले करतील. आता वाट पाहायची नाही. आता जशाला तसं उत्तर द्यायचं. बघू किती दिवसांमध्ये आरोपींना अटक होते. अरे आपण मराठे आहोत मराठे. पाणीच पाजायचं त्यांना. आपण जे बोलतो तेच करतो, असं मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.

# तर उग्र आंदोलनाची शस्त्र उपसू!-मेंढपाळ बांधवांचा इशारा-माजी मंत्री महादेव जानकर, बच्चु कडूंचे समर्थन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

राज्यातील मेंढपाळ बांधवांनी नुकतेच महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदन देऊन मेंढपाळांच्या समस्यांवर तोडगा काढण्याची विनंती केली आहे, मात्र आजतागायत महायुती सरकारने मेंढपाळांच्या मागण्या निकाली काढण्याकरिता कुठलेही ठोस पाऊल उचलले नाही. त्यामूळे मेंढपाळ बांधवांनी उग्र आंदोलनाचे शस्त्र इशारा सरकारला दिला आहे. माजी मंत्री महादेव जानकर व बच्चू कडूंनी मेंढपाळ बांधवाच्या मागण्यांचे समर्थन करित त्यांच्यासोबत उभे राहण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती मेंढपाळ बांधवांनी शनिवारी येथे आयोजित एका पत्रकार परिषदेत दिली.शेळी-मेंढी पालन करून मेंढपाळांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. पशुपालनाशिवाय दुसरे कोणतेही उदरनिर्वाहाचे ठोस साधन नाही. अश्या विपरीत परिस्थितीत आणि वाढत्या महागाईमध्ये मेंढपाळ बांधव शेळी, मेंढी पालन करतात. या सर्व महागाईचा व शासनाच्या कुटील धोरणाचा फटका मेंढपाळांना बांधवांना बसत आहे. शेळी मेंढीच्या आरोग्याचा तसेच



विमा कवच देऊन त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आजही ऐरणीवर आहे. मेंढपाळांच्या निवेदनाची गांभीर्याने ८ दिवसाच्या आत दखल घेऊन योग्य कार्यवाही न केल्यास विभागीय आयुक्त कार्यालयासमोर वाडा आंदोलन करण्याचाइशारा पत्रकार परिषदेतून मेंढपाळ बांधवांनी दिला आहे. पत्रकार परिषदेला तुकाराम यमगर महादेव पोकळे, अनिल चोरमले अवधुत कोरडकर, गुलाब ठोंबरे, भाऊराव ठोंबरे, धनराज गोरे, काळू यमगर, हरिष शिंदे, बाळू गोफणे, भिमराव महानर, निंबा माने, सागर येळे,संतोष घुले, योगेश कारंडे, सुनील कोरडकर, विशाल पिसाळ, हरिभाऊ महानर, लक्ष्मण आयनर, राजु कोकरे, सोनबा हटकर, पंजाब महानर ,बाळू भाऊ कुळाल राजु गोरे समाधान कांबळे, सखाराम कुळाल, नथ्थुजी महानर ,दादाराव महानर, बाबाराव महानर,गुलाब महानर,नाना महानर धोंडीबा कोळपे, सुरेश शिंदे,दसरत केसकर शिवाजी कोरडकर बाळकृष्ण शिंदे,बबन कोपनर,दादाराव कोपनर , अर्जुन शिंदे, रवि येळे, रंगराव शिंदे, रंगराव बिचकुले, शेकलाला सोळाळे नाना कोकरे शरद शिंदे धुळबा पोकळे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**अश्या आहेत मागण्या**

मेंढपाळांना आजही घरकुल योजनेचा लाभ नाही किंवा त्यांच्या पाल्यांना कोणत्याही शैक्षणिक सुविधा किंवा वसतिगृहाचा लाभ देखील मिळत नाही. भारताचे नागरिक असून सुद्धा केवळ मतांपुरता आमचा उपयोग घेतला जात असल्याचा आरोप मेंढपाळ बांधवांनी केला आहे. याशिवाय आपल्या निवेदनात मेंढपाळ बांधवांनी बाहेर राज्यातील कायम स्थानांतरित मेंढपाळांना चराईबंदी करण्यात यावी, जेणे करून त्यांच्यापासून होणाऱ्या रोग-राईपासुन पशुंचा बचाव होईल, भारतीय वन कायदा १९२७ अन्वये बंदी घातलेले वनराई अधिकार उठवावे, शेळया मेंढ्यांच्या आकस्मिक मृत्यूची नुकसान भरपाई मिळावी, मेंढपाळ समुहाला वन हक्क अधिनियम २००६ अंतर्गत चराई करीता कुरणे विकास धोरणे राबविण्यात यावे, मेंढपाळ बांधवा वरील अन्याय थांबून खोटया केसेस मागे घेण्यात याव्या, मेंढपाळ बहुल तालुक्यात शेळया मेंढयाचे मोबाईल हॉस्पीटल तयार करण्यात यावे, नैसर्गिक आपत्ती पासून संरक्षणा करीता मेंढपाळ कुटुंबांना अत्याधुनिक तंबू, साहीत्य, औषध वितरीत करण्यात यावे इत्यादी मागण्या मेंढपाळ बांधवांनी केलेल्या आहे.